नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

या अंकांतील लेखक

* ह. वा. देशपांडे
* म. श्री. मंगरूळकर, बी. ए., एल्. एल्. बी.
* शि. कृ. बारलिंगे
* वि. ज. सहस्रबुद्धे
* मा. ज. कानेटकर

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

संपादक

वा. कृ. चोरघडे

ऑगस्ट १९४९ किंमत ८ आणे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता-
वा. कृ. चोरघडे
संपादक 'युगवाणी'
व्हाइस प्रिन्सिपॉल, कॉमर्स कॉलेज
नागपूर.

युगवाणी

व्यावसायिक पत्रव्यवहाराचा पत्ता-
द. ना. ठाकूर
महेश्वर प्रेस, मुधोळकर पेठ,
अमरावती. (वऱ्हाड).

ऑगस्ट १९४९

अनुक्रमणिका

१ संपादकीय ७३
२ शरीरमाद्यम्: सांघिक खेळ—ह. वा. देशपांडे ७४
३ पहिला घडा—म. श्री. मंगरुळकर, बी. ए., एल. एल. बी. ७९
४ रावणाची लंका सिंहलद्वीप नव्हे!—शि. कृ. बारलिंगे ८१
५ भृंगावर्तनी का पद्मावर्तनी?—वि. ज. सहस्रबुद्धे ८६
६ मराठी वाङ्मयापासून माझ्या अपेक्षा—मा. ज. कानेटकर ९१
७ संघवार्ता १०४

●

[मुखपृष्ठ ३ वरून सुरू]

पर्णे निघू लागतील आणि वि. सा. संघाच्या प्रत्येक सभासदाला मिळतील. अंक न पावल्याची तक्रार "रा. द. ना. ठाकुर, प्रकाशक 'युगवाणी', मुधोळकर पेठ, अमरावती" या पत्त्यावर सभासदांनी परस्पर करावी. 'युगवाणी' च्या संपादकीय कचेरीकडे करावयाचा पत्रव्यवहार "प्रा. वामन कृष्ण चोरघडे, कॉमर्स कॉलेज, नागपूर" या पत्त्यावर परस्पर करावा.

विदर्भ साहित्य संघाची घटना सर्व दुरुस्तींसह पुढील अंकीं प्रसिद्ध होईल. विदर्भ साहित्य संघाच्या ऑगस्ट ४९ मध्ये होणाऱ्या वाङ्मयविषयक परीक्षांचा कार्यक्रम खाली दिला आहे.

विदर्भ साहित्य संघ परीक्षा; ऑगस्ट १९४९, कार्यक्रम

शनिवार ता. ६ ऑगस्ट ४९, दुपारीं ३ ते ६.—साहित्य विनीत, साहित्य परिचित प्रश्नपत्रिका १, साहित्य स्नातक प्रश्नपत्रिका १, साहित्य पारंगत प्रश्नपत्रिका १.

रविवार ता. ७ ऑगस्ट ४९, सकाळीं ८ ते ११.—मराठी प्रवेश, मराठी प्रारंभ, साहित्य परिचित प्रश्नपत्रिका २, साहित्य स्नातक प्रश्नपत्रिका २, साहित्य पारंगत प्रश्नपत्रिका २.

रविवार ता. ७ ऑगस्ट ४९, दुपारीं ३ ते ६, साहित्य स्नातक प्रश्नपत्रिका ३. साहित्य पारंगत प्रश्नपत्रिका ३.

सोमवार ता. ८ ऑगस्ट ४९, सकाळीं ८ ते ११, साहित्य पारंगत प्रश्नपत्रिका ४.

सोमवार ता. ८ ऑगस्ट ४९, दुपारीं ३ ते ६ साहित्य पारंगत प्रश्नपत्रिका ५.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

संपादकीय

क्षमस्व !

आज बऱ्याच दिवसानंतर "युगवाणी" वाचकांच्या भेटीस येत आहे. मध्यंतरी 'युगवाणी'चे चार–पांच अंक निघूं शकले नाहीत. त्याला कारणेंहि तशींच अपरिहार्य होतीं. 'युगवाणी'चे आद्यसंपादक रा. वामन नारायण देशपांडे यांनी 'युगवाणी'च्या संपादकत्वाचा राजीनामा दिल्यामुळे, विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारिणीने प्रा. भ. श्री. पंडित यांची 'युगवाणी'चे संपादक म्हणून नेमणूक केली. परंतु प्रा. भ. श्री. पंडित हे सरकारी महाविद्यालयांत असल्यामुळे, त्यांच्या संपादकत्वाला सरकारी मान्यतेची नियमाप्रमाणे आवश्यकता होती. नंतर त्या दृष्टीने प्रयत्न सुरू झाले. परंतु सरकारी मान्यता दुर्दैवाने मिळूं शकली नाही. आणि म्हणूनच विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाच्या आदेशानुसार 'युगवाणी'चें संपादकत्व मला स्वीकारावें लागलें. या सगळ्या भानगडींत अर्थातच बराच कालापव्यय झाला आणि 'युगवाणी'चे अंक आतापर्यंत निघूं शकले नाहीत. वाचकांनी क्षमा करावी.

'युगवाणी'चे आद्यसंपादक

'युगवाणी'चे आद्यसंपादक रा. वामन नारायण देशपांडे यांनी सतत तीन वर्षे 'युगवाणी'साठी किती परिश्रम घेतले याची मला जाणीव आहे. 'युगवाणी'ला आतापर्यंत मिळालेल्या सर्व यशाचें श्रेय त्यांच्या कर्तृत्वाकडेच आहे यांत शंका नाही. रा. वा. ना. देशपांडे यांनी अगदी प्रारंभापासून 'युगवाणी' संबंधांत जो जिव्हाळा ठेवला, तो यापुढेहि कायमच राहील असा मला विश्वास आहे.

आजचा अंक

वर उल्लेखिलेल्या एकंदर प्रकारामुळे या अंकाची अंतर्बाह्य सजावट करावयाला मला अवधि अगदीच थोडा मिळाला. या अंकांतील उणीवांची मला जाणीव आहे. पुढील अंकापासून 'युगवाणी' चें अंतरंग अधिक आकर्षक करण्याचा यथाशक्ति मी प्रयत्न करीनच. यापुढे 'युगवाणी'चा प्रत्येक अंक दर महिन्याच्या १ त्या तारखेस प्रसिद्ध होत जाईल.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'युगवाणी'चे अंक मध्यंतरी न निघू शकल्यामुळे लेखकांचीहि बरीच गैर-सोय झाली आहे. पत्रव्यवहारांतहि स्वाभाविकपणेंच अव्यवस्था झाली. याबाबत सर्व गोष्टी यापुढे व्यवस्थितपणें पार पडतील असें आश्वासन देतों. लेखकांनीहि 'युगवाणी' वर पूर्ववत लोभ असूं द्यावा.

संघाध्यक्ष डॉ. मा. गो. देशमुख

विदर्भ साहित्य संघाच्या सभासदांनी गुणग्राहकता दाखवून, डॉ. माधव गोपाळ देशमुख यांची यांवर्षी संघाध्यक्ष म्हणून निवड केली याबद्दल मला खरोखरच आनन्द झाला. डॉ. माधवराव देशमुख यांचें मी अन्तःकरणपूर्वक अभिनन्दन करतों. वि. सा. संघाच्या अध्यक्षाची जागा ही केवळ मानाची नसून कामाची आहे आणि या दोन्हीहि दृष्टींनी डॉ. माधवराव देशमुख यांची नियुक्ति मला योग्यच वाटते. डॉ. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली वि. सा. संघाची उत्तरोत्तर भरभराट होईल याबद्दल शंका नाही.

"सुमन-संचय"

विदर्भ साहित्य संघाने संपादित व प्रकाशित केलेला 'सुमन संचय' हा काव्यसंग्रह, हायस्कूल एज्यु. बोर्डानें मॅट्रिक परीक्षेच्या अभ्यासक्रमांत सूक्ष्म वाचनासाठी समाविष्ट केल्यानें, वि. सा. संघाला चांगलेंच उत्तेजन मिळालें आहे. हायस्कूल एज्यु. बोर्डाच्या मराठी अभ्यासक्रम समितीचे वि. सा. संघातर्फे मी आभार मानतों.

शरीरमाद्यम् : सांघिक खेळ

हरिहर वामन देशपांडे

शरीरमाद्यम् म्हणजे सर्व विषयांत शरीराचे महत्व प्रथम श्रेणीचें आहे हें ओळखा. राष्ट्रीय क्षेत्रांत ज्याप्रमाणे आम्ही Nation First राष्ट्र प्रथम ही घोषणा करतों, त्याचप्रमाणे सामाजिकक्षेत्रांत Body first 'शरीरमाद्यम् या घोषणेला महत्त्व दिलें पाहिजे. शारिरीक उन्नतीच्या विषयाचें मौलिक महत्व जितकें आहे तितक्या प्रमाणांत आमच्या सामाजिक अथवा राष्ट्रीय व्यवहारांत, योजनांत, लेखांत अथवा भाषणांत या विषयाकडे जनतेचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यांत येत नाही ही गोष्ट स्पष्ट आहे. शारिरीक आरोग्य व बल यांचा उचित वयांत विकास करणें, आपल्या शरीराची प्रमाणबद्ध रीतीने वाढ घडवून आणणें आणि आमच्या राष्ट्रीय संपत्तीपैकी शरीरसंपत्तीचा जो नैसर्गिक ठेवा आपणांस प्राप्त झाला आहे तो प्रयत्न-पूर्वक समृद्ध करणें यांची आवश्यकता आमच्या देशांत फार प्राचीन काळापासून मान्य करण्यांत आलेली आहे. आमच्या देशांतील वैद्यशास्त्रावरील चरक व सुश्रुत यांच्यासारख्या प्राचीन आचार्यांनीसुद्धा शरीरसंपदा ही तीन प्रकारची असते. एक सहज म्हणजे आईबापापासून आनुवंशिकरीत्या मिळालेली, दुसरी कालज म्हणजे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वयोमानपरत्वें व ऋतुमानपरत्वें प्राप्त होणारी आणि तिसरी अभ्यासज म्हणजे व्यायामादि प्रयत्नांनी साध्य होणारी असें शरीर संपदेचें वर्णन आमच्या वैद्यशास्त्रांच्या आचार्यांनीहि केलेलें आहे.

आमच्या प्राचीन तत्त्वज्ञानविषयक ग्रंथांतसुद्धा शरीरसंपदेपासून प्राप्त होणारें बल व तज्जन्य लाभ यांची अतिशय महति वर्णन करण्यांत आली आहे. मनुष्य शारिरीक सामर्थ्यानें संपन्न झाला म्हणजे शोकमोहाचे अनेक प्रसंग सहन करून शोकमोहाच्या पार जाण्यास तो कसा पात्र बनतो याचें विवरण नारदसनत्कुमार-संवादांत छांदोग्य उपनिषदांत फार उत्तम रीतीनें करण्यांत आलें आहे. बलं बलवतामस्मि, म्हणजे बलवान लोकांच्या ठिकाणीं बसणारें सात्विक बल हें माझें स्वरूप होय हें भगवद्गीतेतलें वचन ज्या मूळ तत्त्वज्ञानाचें प्रतिबिंब होय. तें तत्त्वज्ञान वर निर्देशिलेल्या नारदसनत्कुमारसंवादाच्या रूपानें छांदोग्य उपनिषदांत वर्णन करण्यांत आलें आहे.

संपदा बली भवति अथ उत्थाता भवति। उत्तिष्ठन् परिचारिता भवति। परिचरन् द्रष्टा भवति। श्रोता भवति। मन्ता भवति। बोद्धा भवति। कर्ता भवति। विज्ञाता भवति।

असा छांदोग्यांतला मंत्र असून त्यांत बलापासून विज्ञानापर्यंत होणाऱ्या विकासाची परंपरा फार शास्त्रशुद्ध रीतीनें विशद केलेली आहे. मनुष्य काय किंवा राष्ट्र काय जेव्हां बलवान बनतें तेव्हांच त्याचें उत्थान होतें. ज्याचें उत्थान होतें तो मनुष्य किंवा तें राष्ट्र काय परिचर्या म्हणजे सेवा करण्यास खरोखुरें पात्र बनतें. अशा तऱ्हेची परिचर्या म्हणजे सेवा करतां करतां म्हणजे सेवेच्या माध्यमांतूनच वस्तुस्थितीचें यथार्थ दर्शन होऊं लागतें, व परिस्थिति आकलन करण्याची दृष्टि येते. ही दृष्टि एकदा प्राप्त झाली म्हणजे परिचर्येच्या म्हणजे सेवेच्या माध्यमांतूनच सत्य श्रवण करण्यास मिळूं शकतें. परिस्थितीचें सम्यक दर्शन करण्याची दृष्टि प्राप्त झाल्याशिवाय आपण ज्या सहस्रावधि गोष्टी प्रत्यही श्रवण करीत असतो त्यांतील सत्यासत्याविवेक मनुष्यास करतां येत नाही. ऐकलेल्या अनंत गोष्टींतून जो नेमकें सत्य शोधून काढूं शकतो तोच खरा श्रोता. अशा सत्य शोधनावाचून मनन करणें अशक्य आहे. मननावाचून जाणीव नाही आणि जाणीवेवाचून खरें कर्तृत्व समजूं शकत नाही. विज्ञान म्हणजे ज्ञानानुभव प्राप्त होणें. ही विज्ञानप्राप्ती कर्तृत्ववान पुरुषालाच होऊं शकते. अशी ही बलापासून कर्तृत्व व विज्ञानापर्यंतची शास्त्रीय परंपरा आहे आणि तींत शारिरीक सामर्थ्याचा विनियोग परिचर्या म्हणजे सेवेंत करणें याला केंद्रीय महत्त्व देण्यांत आलेलें आहे आणि या सामर्थ्ययुक्त सेवेच्या मार्गानेच मनुष्याची प्रगति कर्तृत्वापर्यंत व विज्ञानापर्यंत म्हणजे ज्ञानाचा साक्षात् अनुभव घेण्यापर्यंत होऊं शकते. तें महान् सत्य वरील आर्ष वचनांत ग्रथित करण्यांत आलेलें आहे.

आमच्या तत्त्वज्ञानविषयक प्राचीन ग्रंथांतून शारिरीक सामर्थ्यामधून परिणामीं विकसित होणाऱ्या कर्तृत्वाचें व विज्ञानाचें जें वर्णन करण्यात आलेलें आहे त्याचेंच प्रतिबिंब ' शरिरमाद्यम् ' या वचनांत उमटलेलें आहे. हें वचन भारताचा महाकवि कुलगुरु कालिदास याच्या कुमारसंभव नामक महाकाव्यांतील होय हें ध्यानांत घेतलें म्हणजे काव्यासारख्या विषयांतूनसुद्धा शारिरिक स्वास्थ्याच्या विषयाला सहजगत्या महत्त्व देऊन त्यांच्याकडे काव्यरसिक वाचकांचें लक्ष वेधून घेण्याची कल्पना

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्पष्ट होते. ज्या प्रसंगाला अनुसरून कविकुलगुरु कालिदासाने वरील वचन प्रचारिले आहे तो प्रसंग देखील तितकाच बहारदार आहे.

प्रसंग असा आहे की, असुरकुलांनी उच्छाद मांडल्यास नमस्त त्रिभुवन कस्त झालें आहे. अशा वेळीं असुरकुलांचा जो विनाश करूं शकेल असा सेनापति भगवान् शंकरापासून हिमालयाची कन्या पार्वती हिच्या उदरीं जन्मास यावयाचा आहे. त्यासाठी शंकराला प्रसन्न करून घेण्याच्या हेतूने पार्वती हिमालयांतील एका तपोवनांत तपश्चर्या करीत आहे. तिच्या तपाने भगवान् शंकर प्रसन्न झाले; आणि तेजस्वी ब्रम्हचाऱ्याचें रूप धारण करून पार्वतीच्या आश्रमांत प्रगट झाले. एक महान् तेजस्वी व प्रगल्भ वाणीचा ब्रम्हचारी आपल्या आश्रमांत आलेला पाहून पार्वतीने षोडशोपचार-पूर्वक त्याची पूजा केली. नंतर ब्रम्हचारी रूपधारी शंकराने तिला जे कुशल प्रश्न विचारले त्यांत ‘ शरीरमाद्यम् ’ हें वचन आलेलें आहे. ब्रम्हचारी विचारतो, ‘ पार्वती ’ तुझ्या व्रतांच्या सांगतेसाठी समिधा व दर्भ तर तुला येथे सुलभ रीतीने मिळतात ना ! स्नानादि कर्मे व्यवस्थित होण्यासाठी जलाशय तर येथे विपुल आहेत हें इतकें उग्र तपाचरण करीत असतांना तूं आपली शक्ति कायम राखली आहेस ना ! धर्माचरण असो की कर्तव्याचरण असो, तें पार पाडण्याचें मुख्य व आद्य साधन शरीर हेंच असल्यामुळे शरीराची काळजी घेणें अत्यंत आवश्यक असते. अपि प्रियार्थं सुलभ समित्कुशम । जलान्यपि स्नानविधि क्षमाणिते । अपि स्वशक्त्यातपसि वर्तसे । शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् ॥ असा कालिदासाने ब्रह्मचारी रूपधारी शंकराच्या मुखाने उच्चारिलेला मूळ श्लोक आहे आणि त्यांतच “ शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् ” हा महान् सिद्धांत कालिदासाने वर्णन केला आहे.

शारिरीक स्वास्थ्य व सामर्थ्य यांचें हें महत्त्व आमच्या देशांतील प्राकृत कवींनीदेखील वारंवार ठसविण्याचा प्रयत्न केलेला आहे. किंबहुना, एक वेळा मानसिक उन्नतीकडे अथवा बौद्धिक विकासाकडे थोडें दुर्लक्ष झालें तरी चालेल, परंतु शरीरस्वास्थ्य मात्र कधीच गमावून चालणार नाही इतकें या विषयाला महत्त्व देण्याचा प्रयत्न प्राकृत कवींनी देखील केलेला आहे. “ दिल गया तो जाने दे मत जाने दे शरीर । ना खीची कमान तो क्या करेगा तीर ॥” या पंक्तीमधून हाच आशय अभिव्यक्त करण्यांत आलेला आहे. नरदेहाचें महत्त्व वर्णन करीत असतांना समर्थ रामदासस्वामींनी “ धन्य धन्य हा नरदेहो । येथील अपूर्वता पहाहो । जो जो कीये परमार्थ लाहो । तो तो पावे सिद्धीते ” हे जे उद्गार काढले आहेत त्यावरूनसुद्धा मानवी शरीराला आमच्या प्राचीन परंपरेंत किती महत्त्व देण्यांत येत होतें याची कल्पना येऊं शकते. समर्थ रामदासांनी शरीराचें नुसतें शाब्दिक महत्त्वच वर्णन केलें असांतला भाग नाही. त्यांनी त्या काळांत महाराष्ट्रभर आखाडे उघडले. गांवोगांव आखाडे स्थापन करून कुस्ती, लाठी, दांडपट्टा, भाला, तरवार यांच्या खेळांचा शौक वाढविला आणि अशा रीतीने महाराष्ट्रांत जेव्हा शारिरीक सामर्थ्य कमाविण्या-साठी तरुण पिढी झटली तेव्हाच श्री छत्रपति शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याला हजारो–लाखो सैनिक मिळूं शकले, स्वराज्याचा विस्तार होऊं शकला आणि अटकेपार रुमशाम पर्यंत स्वराज्याचा ध्वज नेऊन फडकविण्याची महत्त्वाकांक्षा मूर्त रूप धारण करूं शकली.

आज पुनः आपण स्वराज्याच्या काळांत वावरूं लागलों आहोत. स्वराज्याच्या रक्षणासाठी आणि स्थैर्यासाठी सैन्य, आरमार व विमानदलें वाढविण्यांत येत आहेत.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नगरसेना, ग्रामसेना व प्रांतिक सेवादलें प्रांतोप्रांतीं स्थापन झालीं आहेत अथवा होत आहेत. तरुण विद्यार्थ्यांतून उत्तम प्रकारचे सेनाधिकारी मिळविणें सुलभ व्हावें म्हणून नॅशनल कॅडेट कोअर सारख्या संस्थेची स्थापना झाली आहे. लष्करी शिक्षण देऊन तरुणांना संरक्षणाच्या विद्येंत निष्णात करण्यासाठी सरकारकडून अशा रीतीनें प्रयत्न होत असले तरी या क्षेत्रांत कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा अनुभव असा आहे की, सैनिकीकरणासाठी ज्या योग्यतेचीं शरीरें असायला पाहिजेत त्या योग्यतेचीं शारिरीक स्थिति असलेले तरुण फारच थोडे आढळतात. सैन्यभरतीसाठी अथवा नगरसेना इत्यादि दलांत भरती होण्यासाठी येणाऱ्या तरुणांपैकी शेकडा ५० | ६० तरुण या कामासाठी अपात्र असलेले वैद्यकीय तपासणींत आढळून येते. कांही कांही ठिकाणीं हें प्रमाण याहून जास्त असलेलें दिसून येतें. वजन कमी असणें व अंतर्गळ, गजकर्ण, खरूज, इसब इत्यादि त्वचारोग दुर्बळ हृदय, वाढलेल्या प्लीहा व यकृतें, अपचनजन्य विकार यांचा सर्वत्र प्रादुर्भाव दिसून येतो. अशा तऱ्हेनें शारिरीक सुपात्रतेच्या अभावीं देशांतील केवढी तरी मनुष्यसंख्या सैन्य व तत्सम इतर व्यवसायासाठी अयोग्य ठरते आहे. स्वराज्याच्या अभिवृद्धीसाठी, राष्ट्रीय संपत्तींत भर घालण्यासाठी, उद्योगधंदे व कारखाने चालविण्यासाठी आणि राज्यकारभाराचा वाढता व्याप सांभाळण्यासाठी मनुष्यशक्ति वाढत्या प्रमाणांत आवश्यक झाली आहे. या सर्व क्षेत्रांत कामें निर्माण होत आहेत आणि कार्यक्षम व कर्तबगार तरुणांची उणीव भासूं लागली आहे. गेल्या एक वर्षांतील पब्लिक सर्व्हिस कमिशनांच्या अधिकाऱ्यांनी दाखल केलेला अहवाल जरी एक वेळा नजरेखालून घातला तरी सरकारी नोकरीसाठी या कमिशनांच्या समोर जाणाऱ्या अर्जदार तरुणांची शारिरीक अवस्था किती पतन पावली आहे याची कल्पना येऊं शकते. किती तरी तरुणांना शारिरीक सुपात्रतेच्या अभावीं नोकऱ्या मिळणें असंभव झालें आहे. अधिक काम करण्याची आवश्यकता देशाला आज जितकी भासत आहे इतकी यापूर्वी केव्हाच भासली नसेल, आणि वस्तुस्थिति तर अशी आहे की, अधिक काम करणें तर लांबच राहिलें, नित्याचीं कामें पार पाडणें सुद्धा कठिण जात आहे. कार्यक्षमतेचा उत्तरोत्तर ऱ्हास होत आहे. या सर्व परिस्थितीचा अर्थ हा आहे की, स्वराज्याचें संरक्षण करावयाचें असो अथवा स्वराज्याची अभिवृद्धि करावयाची असो अथवा राष्ट्रीय संपत्तींत भर घालावयाची असो, अथवा उद्योगधंद्याची वाढ करावयाची असो, या सर्व कामांत लागणारी मनुष्यसंख्या आमच्या देशांत विपूल असूनदेखील, तिचा शारिरीक सुपात्रतेच्या अभावीं व्हावा तसा उपयोग होऊं शकत नाही. म्हणून शारिरीक सुपात्रतेचा विषय आजच्या आमच्या राजकारणांत, अर्थकारणांत अथवा समाजकारणांत आद्य महत्त्वाचा समजला जावयास पाहिजे आणि आमच्या देशांतील जनतेचें-विशेषत: तरुण पिढीचें-आरोग्य आणि शारिरीक सामर्थ्य यांचें मान वाढविण्याचा प्रयत्न मोठ्या जोरदार रीतीनें व्हावयास पाहिजे.

शारिरीक पात्रतेच्या या एकूण विषयाची व्याप्ति अतिशय मोठी आहे. तिचें यथार्थ ज्ञान करून घेणें आवश्यक आहे. या विषयाचीं दोन ठळक अंगें आहेत. एक अंग म्हणजे सांप्रत उत्तरोत्तर वाढत्या प्रमाणांत होत असलेला शारिरिक ऱ्हास थांबविणें हें होय, आणि दुसरें अंग म्हणजे आमच्या देशांतील लोकांचें वजन माप, उंची आणि आयुष्य यांची वाढ घडवून आणणें हें होय. या विषयाचीं हीं दोनहि अंगें नीट ध्यानांत घेऊनच शारिरीक सुधारणेचे प्रयत्न व्हावयास पाहिजेत. एकांगी प्रयत्नांनी अपेक्षित यश मिळूं शकणार नाही हें सांगावयाला नकोच.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

देशांतील सर्वसामान्य आरोग्याचें मान वाढविणें, रोगराई व सांथीचे रोग यांच्यावर चौफेर हल्ला चढवून त्यांचें प्रमाण कमी कमी करीत नेणें, साफसफाई व स्वच्छता यांच्या ज्ञानाचा व यथार्थ कल्पनांचा प्रसार करणें, आरोग्याला विघातक सवयी आणि वस्तु यांचा नायनाट करणें, खाद्य पेय पदार्थांचें पोषकत्व सुधारणें, चौरस व समतोल आहाराचा प्रसार करणें, दररोजच्या भोजनांतून पोटांत जाणाऱ्या पदार्थांना अधिक पोषक स्वरूप मिळवून देण्याचा प्रयत्न करणें, गाई, म्हशी, बकऱ्या यांची अभिवृद्धि करून दूध, तूप, दही, ताक, अंडीं इत्यादि शरीरपोषक प्रसिद्ध पदार्थांचा सुकाळ देशांत घडवून आणणें इत्यादि रीतीनेच सांप्रत वाढत चाललेल्या शारिरीक ऱ्हासाला आळा घालणें शक्य होईल. तथापि हें या प्रयत्नाचें केवळ एक अंग होय हें विसरून चालणार नाही.

याच विषयाच्या दुसऱ्या अंगाचे प्रयत्नहि त्याबरोबरच चालू ठेवावे लागतील. उत्तम, सुडौल, सौष्ठवयुक्त, प्रमाणबद्ध व बलशाली शरीर संपादन करण्याची अभिरुचि जनतेंत निर्माण करावी लागेल, आणि उत्तम शरीराचें महत्त्व जन्मादारभ्य मुलांच्या मनावर ठसविलें जाईल अशा प्रकारचें वातावरण समाजांत निर्माण करावें लागेल. व्यायाम, खेळ, दंगली, सामने यांना सर्वत्र उत्तेजन द्यावें लागेल. व्यायामशाळा, जिमखाने, आखाडे, क्रीडांगणें यांची सर्वत्र विपुलता घडवून आणावी लागेल. शारिरीक अभिवृद्धीसाठी पोषक पण स्वस्त अशा आहाराचें संशोधन करावें लागेल. उंची वाढविणारे, फुफ्फुसांचा व छातीचा विकास करणारे, निर्भयता, धैर्य व प्रसंगावधान इत्यादि गुणांचा विकास करणारे व्यायाम कोणते होत, व ते कसे करावेत, याचें शास्त्रशुद्ध ज्ञान देणारे हजारो शिक्षक शिकवून तयार करावे लागतील. तरुणांच्या शारिरीक स्थितीची वारंवार वैद्यकीय तपासणी करून तींत आढळून येणारे दोष दूर करण्यासाठी पिच्छा पुरवावा लागेल, आणि वजन, उंची, छाति, कार्यक्षमता, चापल्य इत्यादि गुणांची किती वाढ झाली आहे, याचें रेकॉर्ड ठेवावें लागेल आणि अधिक वाढ करण्यासाठी वारंवार तज्ज्ञांकडून प्रयत्न करावे लागतील.

(ऑल इंडिया रेडिओ, नागपूरच्या कृपेने)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१९४९
ऑगस्ट

पहिला धडा

ले. : मधुकर श्री. मंगरूळकर
बी.ए.,एल्.एल्.बी., नागपूर

★

सुहास खुर्चीवर येऊन बसला आणि थिएटरमधले दिवे मालवले. मुख्य चित्रपट सुरू होण्यापूर्वी जाहिराती दाखविणें सुरू झालें होतें. सुहासनं बसल्या जागेवरून समोरच्या रांगेकडे नजर टाकली नि बाजूच्या खुर्चीकडे मान वळवून म्हटलं—

" दीक्षिताचं नवं जोडपं आलेलं दिसतंय सिनेमाला— "

पण शेजारच्या खुर्चीवरून कांही उत्तर न आल्यामुळे त्यानं मान वळवली. खुर्ची रिकामी होती. " अरे ! कमल गेली तरी कुठे ? की बसली वेडाबाई माझी वाट पाहात बाहेरच— "

तो अर्धवट उठला. प्रवेशद्वाराच्या बाहेर कमल उभी होती. सुहासनं कधीहि न पाहिलेला एक तरुण तिच्याशीं बोलत होता. सुहासनं भिवया चढवल्या. नवऱ्याबरोबर सिनेमाला येऊन एका तिऱ्हाइताबरोबर बाहेर गप्पा मारीत उभं रहावं याचं त्याला आश्चर्य वाटलं. त्याला कमलचा रागहि आला. फाजील मोकळेपणानं कमल त्याच्याशीं बोलते आहे असं सुहासला वाटायला लागलं होतं. आता उठून बाहेर जावं अन् खस्कन कमलचा हात ओढून तिला आणून बसवावं असं त्याला वाटत होतं. पण तीच आंत यायला वळली होती.

' वा ! चांगलं ! चित्रपट सुरू व्हायला आलां नि आपण गप्पांतच गुंगलों की—असं काहीसं त्या तरुणानं म्हटलं असावं. कारण ते शब्द ऐकतांच कमलनं एकदम भानावर आल्यासारखं केलं होतं. द्वाररक्षकानं बॅटरीच्या दिव्याचा प्रकाश पाडून त्यांना जागा दाखवली. सुहासजवळच्या रिकाम्या खुर्चीवर कमल मुकाट्यानं जाऊन बसली. तिला चोरट्यासारखं झाऊं होतं. सुहासनं फक्त एकवार तिच्याकडे रोखून पाहलं होतं. पण त्या अंधारांतहि ' आपल्या माणसाच्या ' नजरेचा अर्थ कमलला कळला होता.

मधून मधून त्या तरुणानं खालच्या आवाजांत बोलायला सुरवात केली होती. कमलला सारं कळत असूनहि उत्तर दिल्याशिवाय भागत नव्हतं. सुहासनं अंधारांतच आपला पाय अंदाजानं कमलच्या पायावर दाबला व हळूच म्हटलं,

" म्हटलं नवरा आलाय सिनेमाला— "

त्या शब्दांनी मात्र काम केलं. कमलच्या तोंडाला एकदम कुलूप बसलं. सुहासनं रात्रभर तो राग तसाच जिरूं दिला. दुसऱ्या दिवशी सकाळी देखील तिचा अबोला कायम असलेला पाहून तो म्हणाला,

" रागावलीस वाटतं माझ्यावर— "

" मी कशाला बाई रागवावं कुणावर— "

७९ त्यानं तिचा हात धरला नि म्हटलं,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'पण असं पहा कमल! तुझं चुकलं असं नाही का वाटत तुला ...'

तिनं आपला हात सोडवून घेतला अन् आंत जात धुसफुसत म्हटलं—

'माहेरकडच्या माणसाशीं देखील बोलायची चोरी. लग्नानंतर एकदा तरी घाडलं का! कुणी खुशाली सांगितली तर तिकडूनहि संशयाचीं भुतं मानगुटीला बसायला तयार—

" मला भूत म्हणतेस काय-! थांब कळवतोच तुझ्या बाबांना— "

" नाही म्हटलं तरी म्हटलं! माझा कुणी कैवारीच उरला नाही...! आता या घरांतच मरेन! पुन्हा माहेरचें नांव काढेन तर अगदी— "

'काळ्या कुत्र्याची शपथ—' सुहासने तें वाक्य पुरें केलें.

" अन् इथं तरी कुणाचं अडलंय पाठवायला, दिसेलच! अग अग म्हशी अन् मला कुठं नेशी— "

मला म्हैस म्हणा, काही म्हणा—

तिनं आपला राग भांडीं आपटून व्यक्त केला. सुहास म्हणाला,

'आजच पत्र आलंय सासरेबोवाचं सुशीचं लग्न ठरलंय म्हणून— कळवून देतों त्यांना वेळ नाही म्हणून —

आपण हॉस्पिटलमध्ये गेलों की पत्रासाठी संशोधन सुरू होणार हें त्याला माहीत होतं. म्हणून सासरेबोवाचं न आलेलं पत्र लिहिण्यासाठी तो आपल्या खोलीकडे वळला. आपल्याला अनोळखी असलेल्या तरुणाशीं कमलनं अगदी भान हरपून गप्पा माराव्या याचं त्याला अजूनहि आश्चर्य वाटत होतं. पण मनांतल्या मनांत तर्ककुतर्क न करतां समंजसपणें कमलला जर त्यानं विचारलं असतं तर तिनं सांगितलं नसतं असं थोडंच होतं.

—तो तरुण कमलच्या माहेरी —त्यांच्या वाड्यांत भाड्यानं रहात असे. माहेरच्या बातमीसाठी आसुसलेल्या कमलला त्यानं घरची थोडीशी बातमी सांगतांच तिला स्वत्व विसरून गेल्यागत व्हावं यांत आश्चर्य नव्हतं. जिन्यावरून उतरतांना आईचा पाय घसरून तो बराच दुखावला होता हें ऐकून तिच्या पायांत कळ उठली होती. पण ही तीन महिन्यापूर्वीची गोष्ट आहे असं कळतांच तिला हायसं वाटलं होतं. सुशीलाला दाखवायला बाबा ग्वालेरला गेले होते पण प्रथमवर म्हणुन मिरविणारा बिजवर कसा निघाला, त्याची एक बायको वेडी होती वगैरे गोष्टी ऐकून तिची करमणूक झाली होती.

या —असल्या किती तरी गोष्टी रात्रीच्या निवांत वेळी झोपेची आराधना करीत असतां कमलनं सुहासला सांगितल्या असत्या. पण या क्षुल्लक वाटणाऱ्या प्रसंगाचं पर्यवसान भलत्याच प्रसंगांत होऊं पहात होतं.

असले प्रसंग आजकाल वरचेवर होऊं लागले होते. कमलच्या प्रत्येक कृतीकडे आजकाल त्याचं बारीक लक्ष असे. ती जाते कुठें, तिच्याकडे येतं कोण, तिला पत्र येतात का आणि येत असलीं तर तीं कुठून! असल्या लहान लहान गोष्टींतून संशयाचीं बीजं आपल्या नकळत आपल्या मनोभूमींत रुजत आहेत हें त्याच्या लक्षांत येत नव्हतं. कमलला देखील त्याच्या स्वभावाचे हे अनोळखी पैलू आजकालच दिसू लागले होते.

तिला वाटे माझं चुकतं का कुठे! तरी मी एक क्षणहि कुठं जात नाही. प्रत्येक क्षणाला त्यांच्या मूर्तीशिवाय इतरांना माझ्या मनांत थारा नसतो. शक्य असतं तर हनुमानासारखं हृदय फाडून मी दाखविलं असतं. मग त्यांनी माझ्याशीं असं का वागावं! ......

[पान ९७ वर चालू]

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रावणाची लंका सिंहलद्वीप (Ceylon) नव्हे !

श्री. शिवदास कृष्ण बारलिंगे, ॲडव्होकेट, नागपूर.

इ. स. १८९९ मध्ये जेव्हा कै. हरि माधव पंडित यांनी 'विविधज्ञान विस्तार' मध्ये पंचवटी-स्थळ-निर्णयासंबंधीं श्रीमंत कुरुंदवाडकर यांचे विरुद्ध लिहिण्यास लेखणी उचलली व त्याविषयीं लिहूं लागले, तेव्हा, रामाच्या वनवासांतील मार्गाचें आलोडन करीत असतां, रामायणकारांनी कृष्णा, कावेरी, तुंगभद्रा वगैरे नद्या रामायणांत का सांगितल्या नाहींत वगैरे प्रश्न उपस्थित झाले; त्यांत रामायणकारांना या नद्या माहीत नसाव्या असा सर्रास शेरा कै. पंडितांनी मारण्याचें धाडस केलें आहे. अर्थात् लंका म्हणजे सिंहलद्वीप (Ceylon) असें त्यावेळीं मानलें जात होतें व म्हणूनच ह्यामध्ये मार्गांत पडणाऱ्या नद्या रामायणाच्या श्रीवाल्मीकि कवींनी वर्णिल्या पाहिजे होत्या हा त्यांचा तर्क अस्थानी नव्हता.

परंतु 'रामटेक' वरील लेखाकरता जेव्हा आम्ही रामायणांत रामाच्या मार्गाचें संशोधन केलें त्यावेळीं राम-रावणाच्या युद्धाकरता देखील गोदावरीचे खाली येण्याचेंहि आम्हांस कारण पडलें नाही. विराध-संवाद तर प्रथमच झाला. परंतु अगस्ति ऋषीच्या आश्रमाचे पूर्वेस राम पर्णशालेंत आल्यावर देखील, जेव्हा राम-लक्ष्मणाची व शूर्पणखेची गाठ पडली व त्रिशिरा-खरादि राक्षसांशीं युद्ध झालें, तेव्हा त्यांनी गोदावरी ओलांडली नव्हती असें दिसून आलें. हे राक्षस पूर्वघाटाचे जवळच समुद्राशीं लागूनच रहात होते व ह्या त्यांच्या प्रदेशाला अनर्घराघवाच्या 'रुचिमति'–टीकाकाराने 'रक्षोभूमि' असें निःसंदिग्ध म्हटलें आहे तें बरोबर दिसतें. सुग्रीव व वाली हे तिकडे जवळच रहात होते, व श्री मारुतीने समुद्र-लंघन करण्याचें आव्हान जेव्हा स्वीकारलें व त्याप्रमाणे उड्डाणास आरंभ केला, त्यावेळीं समुद्रांत पडलेला मैनाक पर्वत मध्येच उपस्थित झाला व श्री मारुतीचे वडिलांचे म्हणजे वायुमहाराजांचे त्याजवर म्हणजे मैनाकावर फार उपकार आहेत, व म्हणून कृतज्ञताबुद्धीने तो श्री मारुतीची वाटेल ती सेवा करण्यास तयार आहे असें म्हणूं लागला. हें प्रकरण सुंदरकांडाचे व युद्धकांडाचे मेंडावर रामायणांत दिलें आहे. आजच्या भूगोलांत पाहूं गेलें तर हा मैनाकपर्वत 'मल्कन्गिरी' म्हणून प्रसिद्ध दिसतो व तो गोदावरीचे मुखाजवळ उत्तरेकडे समुद्र किनाऱ्याशीं लागूनच आहे. हा मैनाकपर्वताशीं लागून असलेला समुद्रकिनारा ओलांडला की गोदावरीचे मुखास आरंभ होतो, व त्या गोदावरीचे जलमय मुखांत अजूनहि लहानमोठीं अशीं अनेक बेटें (Deltas) अस्तित्वांत आहेत. व त्या सर्व बेटांस 'लंका' असेंच अजूनहि म्हणतात. ही प्रथा इंपीरिअल गॅझेटिअरमध्ये गोदावरी नदीचें वर्णनांत दिली आहे; व रेव्हिन्यू केसेस म्हणजे

मालकाळीचे मुकदम्यामध्ये न्याय देतांना हायकोर्ट किंवा फेडरल कोर्टांच्या न्यायाधिशांनी त्या प्रथा-परंपरेचा वेळोवेळीं निर्देश केला आहे असें आम्हांस सांगण्यांत आलें आहे.

वरील गोष्टींबरोबरच रामायणांतील कांहीं गोष्टींचा येथे निर्देश करणें या निबंधाच्या दृष्टीने फार जरूरीचें आहे. शूर्पणखेने यावे व 'माझा स्त्रीत्वाकरता स्वीकार करावा' असें रामलक्ष्मणांस म्हणावे, व शेवटीं तिचें नाक कापलें गेल्यावर तिने आपला बंधु रावण याजकडे तक्रार करावी, व त्यावर खर-त्रिशिर यांनी आपलें प्रचंड सैन्य लागलीच आणून, रामाशीं घनघोर युद्ध करावे व ते मारले गेल्यावर, रावणाने यावे व सीतेचें हरण करावे, व ह्या सर्व घटना इतक्या त्वरित घडून याव्या की त्यांना फार वेळ लागू नये, ह्यावरून रावणाची लंका त्या ठिकाणाहून फार लांब नव्हती— निदान सिंहलद्वीप (Ceylon) इतकी ४००-५०० मैल इतकी दूर नव्हती हें स्पष्ट आहे. रामायण लिहिण्यांत श्री वाल्मिकींनी कितीहि अतिशयोक्ति उपयोगांत आणलेली असली, व श्रीरामाला खास विष्णूची भूमिका दिली असली, तरी त्यांतील खरें सार आज आपल्या तर्कबुद्धीने अजमावूं नये, व अंधश्रद्धेलाच बळी पडावे असें नाही. श्रद्धेला तरी कांहीं मर्यादा आहेतच की नाही! श्रद्धा ही जशी मानवी बुद्धीचा एक भाग आहे, तसेंच, सारासार विचार करून योग्य तर्क करणें हाहि बुद्धीचाच पण जास्त महत्त्वाचा भाग आहे ना! कवींच्या उत्साही कल्पनेला संक्षेप किती द्यावयाचा किंवा वजाबाकी कशी करावयाची याचें मोजमाप करणें हें बुद्धीचेंच काम आहे. अपक्व किंवा रानटी लोकांची बुद्धि जवळ जवळ पशूंच्या बुद्धीसारखीच असते. सुसंस्कृत बुद्धि ही त्यापेक्षा फारच उच्च असते पण तिचेहि अनेक प्रकार व टप्पे आहेत. अशा सुसंस्कृत व विकसित झालेल्या बुद्धीस ५-६ हजार वर्षांपूर्वीच्या मानवी बुद्धीने केलेलें कार्य, एकदम काय म्हणून पटावे! विचाराअंतीं असेंच म्हणावें लागेल की श्री वाल्मीकि पुराण-पुरुष म्हणून आदरास कितीहि पात्र असले व त्याबद्दल आपणांस योग्य असा अभिमान असला, तरी त्यांनी केलेलीं वर्णनें, कांहीं ठिकाणीं तरी, कल्पनेचा अतिरेक आहे. लंकेने मूर्त-स्वरूप धारण करून, मारुतीस अडविलें, वगैरे गोष्टी वर्णनांतून वजाच केलेल्या बऱ्या! परंतु अशा वर्णनाचाच आपल्या अलीकडील कवींनी गाजावाजा करावा व त्याचें अक्षरशः भाषांतर करून जनतेस त्याचेंच शिक्षण द्यावे हें खरोखर शिक्षण देणें नसून जवळ-जवळ फसविणेंच होय. ही फसवणूक मनांतून नाहीशी केल्यास, रामायण इतिहास राहूं शकत नाही, केवळ कादंबरीच होय असाहि निर्णय घेणें बरोबर होणार नाही. ती त्यावेळची वर्णन करण्याची शैली होती एवढेंच!

या सर्व बाबींचा पूर्ण विचार केला असतां, रावणाची लंका, रामाचे पर्णशालेपासून फार दूर नव्हती असेंच म्हणावे लागतें; व वर दिलेल्या माहितीवरून ती गोदावरी मुखांतील जलाशयांत होती; व तेथून खरादि रावणाचे बंधू सहज येणें-जाणें करूं शकत होते असें अनुमानच योग्य ठरतें. हल्लींचे सिंहलद्वीपा-(Ceylon)हून अशा हालचाली शक्य नव्हत्या.

इतरांप्रमाणे आम्हीहि भावनांचा अतिरेक केला तर सर्व रामायणच कादंबरी मानावी लागेल! व अर्थातच रावण व त्याची लंका कवि-कल्पितांच्या वर्गांत काढावी लागेल, परंतु कादंबरी व इतिहास यांमधील खरा फरक हा आहे की,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कादंबरींतील सर्व कथानक अजिबात काल्पनिक म्हणजे अवास्तव असलें पाहिजे व यांतील तपशील देखील त्या काल्पनिक कथानकाचा आवश्यक असा अवास्तव व कल्पित भाग असला पाहिजे. तो निरर्थक नसला पाहिजे, कारण निरर्थक असा खोटा भाग घालण्यांत काय अर्थ! व कादंबरीमध्ये असा भाग कोणीहि हेतुशिवाय घालणारहि नाही. खऱ्या इतिहासांत पुष्कळ गोष्टी निरर्थक असतात. परंतु त्या सृष्टींत घडल्या असतात म्हणून घालाव्या लागतात. उदाहरणार्थ 'भार्गवाश्रम' किंवा अगस्त्याश्रम व त्यांचें वर्णन निरर्थकच कादंबरींत काय म्हणून द्यावयाचें! दशरथाचीं मुलें राम, लक्ष्मण अथवा भरत त्यांच्या चमत्कारपूर्ण चरित्रामुळे कादंबरीचे विषय होऊं शकतील, पण शत्रुघ्नाचें काय प्रयोजन! त्याचें अस्तित्व सत्य इतिहासच असला पाहिजे. त्याचप्रमाणे राजांचीं नांवें व त्यांचे राज्यशासनाचीं वर्षे वगैरे हें ऐतिहासिक सत्यच राहील; कादंबरींत त्यांची कांही गरज नाही व तो निरर्थक मजकूर म्हणून, कादंबरीकारावर तो दोष म्हणूनच प्रवाद राहील. त्याच-प्रमाणे ग्रहणें वगैरे घटना इतिहास दाखवितात; कादंबरीमध्ये त्या येऊं शकत नाहीत कारण तें खगोलशास्त्राचें सत्य आहे. त्या शुद्ध काल्पनिक असतील तर खोट्या असल्या पाहिजेत व हें खगोलशास्त्रावरून काढतां येईल, पण जर त्या खगोल-शास्त्राशीं जमत असल्या, तर त्या घटना ऐतिहासिक सत्य म्हणूनच मानाव्या लागतील. अशा घटना रामायणांत ठिकठिकाणीं आहेत व त्या ऐतिहासिक सत्य मानण्यास कारण त्यांचें खगोलशास्त्राच्या नियमांशीं व त्यावरून केलेल्या गणिताशीं अचूक जमणें हें होय. ह्यावरून त्यांतून कवीचीं अतिशयोक्तीचीं वर्णनें वजा केल्यास रामायण ऐतिहासिक सत्य ठरूं पहातें व म्हणूनच त्यांतील मजकूर इतिहासांत खरोखरी घडलेल्या घटनाच असल्या पाहिजेत असें अनुमान करणें भाग पडतें. याच कारणाकरता रावण ही व्यक्ति ऐतिहासिक सत्य म्हणून मानावी लागते व त्याच-प्रमाणे त्याची लंका हीहि एक ऐतिहासिक सत्य म्हणून मानावी लागेल. अशा लंकेचें वर्णन रामायणावरून पाहातां, ती गोदावरीचे खाली जात नाही व म्हणूनच ती सिंहलद्वीपहि होऊं शकत नाही.

मग लंका ही सिंहलद्वीप होय अशी कल्पना आमच्या कांही पूर्वजांच्या डोक्यांत कशी आली हाहि एक प्रश्नच आहे. याचें उत्तर फार कठिण नाही. रामायणास आज जवळजवळ ६००० वर्षें झालीं आहेत. मधल्या काळांत आमच्या पूर्वजांपैकी कांहींनी समुद्रापलिकडे सिंहलद्वीप पाहिलें, व तें रामायणांत सांगितल्या-प्रमाणे दाक्षिणेस आहे असेंहि पाहिलें. रामायणांतील अतिशयोक्तिपूर्ण लंकेच्या वर्णना-वरून, त्यासारखें दुसरें बेट दिसेना, व तेंहि दाक्षिणेस दिसेना यावरून सिंहलद्वीपच लंका असावी असा तर्क करण्यांत आला व तशी प्रथा पडली. अशा प्रथेचा प्रसार होण्यास फार वेळ लागत नाही, व कालाचा वज्रलेप झाला व पुनरुच्चार करण्यांत आला की तेंच एक सत्य होऊन बसतें व त्यालाच लोक सत्य मानतात. रामायणांतील जनस्थान नाशिक होय अशी परंपरा पडली आहे ना! पण ते साफ असत्य आहे हें रामायणावरून सहज दिसतें. गोदावरी तेथे असल्यामुळे अशी प्रथा पडली असावी. पण एक वेळ अशा प्रथेचा प्रसार झाला म्हणजे तो टिकतो व मग मूळ सत्य कोणी कांही केल्या खरें मानत नाहीत. खोट्या का होईना पण पडलेल्या प्रथांमध्ये जो जोर असतो तो असा असतो व तो कांही केल्या नाहीसा होऊं शकत नाही.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लंकेसंबंधीं प्रथा अशीच उद्‌भवली. पण खरोखर ती गोदावरीमुखांतील बेटांपैकीं एक मोठें बेट असावें हेंच खरें दिसतें. गोदावरीच्या खालीं कृष्णा केवढ्या तरी रुंद व विस्तीर्ण मुखानें, गोदावरीपासून थोड्याच अंतरावर पूर्व समुद्रास मिळते. किती तरी सुंदर तें दृश्य आहे ! पण रामायणांत त्यासंबंधीं एक अक्षरहि नाहीं. त्याचप्रमाणें इतर नद्यांचें–म्हणजे कावेरी, ताम्रपर्णी वगैरेचें कांहींहि वर्णन रामायणकारांनीं केलें नाहीं. रावणाची लंका ही सिंहलद्वीप असती तर हें वर्णन अपरिहार्यच होतें. त्याचप्रमाणें गोदावरीखालील इतर सिंहलद्वीपापर्यंतच्या कोणत्याहि प्रदेशाचें वर्णन नाहीं. हाहि एक मोठा भक्कम व बलिष्ठ असा पुरावा आमच्या तर्फेचा आहे.

नर्मदा तर गोदावरीचे अलीकडेच आहे. पण तिचेंहि वर्णन किंवा तिचा नामनिर्देश रामायणांत नाहीं, हें कसें असें आमच्या कल्पनेचे विरोधक विचारतात. पण याचें उत्तर सरळ व सोपें आहे. राम ज्यावेळीं सुतीक्ष्णाश्रमाहून अगस्तीचे आश्रमाकडे यावयास निघाले, तेव्हां ते हल्लींचे अमरकंटकावरून आले असले पाहिजेत. तेथें नर्मदेचा व सुवर्णभद्र यांचा उगम आहे. तेथील नर्मदा निरुंद व लहान प्रवाहाची आहे-लहानसा नालाच आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति नाहीं. ती आम्ही तेथें पाहिली आहे व आम्ही ती स्वतः पायानें ओलांडली आहे. तेथेंच भृगुकुंड आहे व दण्डकारण्यहि तेथेंच आहे. रामाचा मार्गहि चित्रकुटावरून भद्राचलमकडचा रामायणांत दिलेला तोच असूं शकतो, इतरत्र नर्मदा ओलांडून जाण्यासारखी नाहीं. या परिस्थितीवरून रामायणांत नर्मदावतरण नाहीं तें योग्यच आहे व यावरून आमच्या लंकेसंबंधीच्या कल्पनेला कोणत्याहि प्रकारें अडथळा न येतां दुजोराच मिळतो. रामायणाचे उत्तरकांडांत नर्मदेचा निर्देश सापडतो यावरून रामाणकारांना ती माहीत होती हें उघड आहे. तसें इतर नद्यांचें नाहीं.

ह्या सर्व कारणांवरून लंकेची उपस्थिति गोदावरीचे मुखांतच होती हें निःसंदिग्ध निश्चित ठरतें.

एक वेळ सर्व रामायण, किंवा रामाचा वनवास व सीतेचें अपहरण कादंबरी मानलें तरी ह्याकरता घेतलेले प्रदेश व त्यांचे भौगोलिक वर्णन भूगोलदृष्ट्या सत्य राहूं शकतें, त्यादृष्टीनेहि रावणाची लंका गोदावरीमुखांतील एक बेटच असलें पाहिजे. सिंहलद्वीप होऊं शकत नाहीं. खरें पाहिलें तर सिंहलद्वीप इतकें दूर होतें कीं रामास तेथपर्यंत जाण्यास सहा महिने लागले असते. त्या काळांत इकडे रामाचें रावणाशीं युद्धहि संपलें हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

रामायणानंतर निरनिराळ्या काळच्या संस्कृतज्ञांनीं आपापल्या कल्पनेप्रमाणें पुराणें व काव्यें लिहिलीं. त्यांत सिंहलद्वीप हीच लंका असें समजुन पुष्कळसें वर्णन केलें आहे, असें कांहीं लेखांवरून समजतें. उदाहरणार्थ नाशिकला जनस्थान समजुन तेथेंच पंचवटी वगैरे निर्माण करणें, व तेथून रामास लंकेस म्हणजे सिंहलद्वीपास पाठविणें, अशाहि मिथ्या गोष्टी कांहीं रामायणानंतरच्या पुराणांत आल्या आहेत व त्यावरून श्रीरामाच्या वनवासमार्गावर बरींच रणें पडलीं आहेत हें विविधज्ञानविस्तारांतील पंचवटी-स्थलनिर्णयावरील इ. स. १८९९ च्या मार्चचे अंकावरून दिसून येईल. त्यांत श्रीमंत कुरुंदवाडकरांनीं जो पक्ष घेतला आहे त्यावरून हें आमचें विधान

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ
अनुक्रमणिका

खरें आहे असें दिसेल. तसेंच रा. माधव श्रीहरि अणे— ब्रिटिश राजवटींतील सीलोनमधील प्रतिनिधि हे सिलोनमध्ये असतांना, कांही स्थलप्रदेशांचें नामसादृष्य रामायणांतील पर्वतांशीं त्यांना आढळून आलें असें त्यांनी एका व्याख्यानांत सांगितलें. त्याचें वर्णन केसरींत आलें आहे. उदाहरणार्थ लंबगिरी व लंबोदाघाट रामायणांतील त्रिकूट व सिंहलद्वीपांतील तीन शिखरें, सिंहलद्वीप म्हणजेच रामायणांतील लंका असा सिंहली लोकांचा प्रचलित असलेला समज, वगैरे गोष्टींचा त्यांनी उल्लेख केला आहे. तथापि " सीलोन व लंका यांचे ऐक्याचे प्रश्नासंबंधीं निश्चित विधान मी करूं इच्छित नाहीं. कारण यासंबंधीं सर्व साधकबाधक वाङ्मयाचा अभ्यास करण्यास मला सवड नाहीं असेंहि ते म्हणाले.

यासंबंधीं आमचें थोडक्यांत सांगणें असें आहे की, रामायणास ५-६ हजार वर्षें होऊन गेलीं व सर्व हिंदुस्थानभर रामासंबंधीं इतक्या कथा व दंतकथा निर्माण झाल्या की, जो तो म्हणूं लागला की ' आमच्या प्रदेशांत राम आले होते ! त्याप्रमाणे त्यांनी कथा बसविल्या व कांही स्थलांना रामकथेशीं जुळतील अशीं नांवें दिलीं आहेत, मलबारकडील एक सुशिक्षित गृहस्थ सांगूं लागले की श्रीराम मलबारांत आले होते व त्यांच्या संबंधीच्या अनेक कथा तेथे प्रचलित आहेत. नाशिकच्या जनस्थानासंबंधाचा मजकूर वर आलाच आहे. कांही विद्वान लोकांनी असेंहि म्हटलें आहे की गोदावरीमुख म्हणजे गोदावरीचें उगमस्थान. अशा स्थितींत सिंहली लोकांनी काय म्हणून मागे रहावे ! रामायण वाचल्यावर किंवा त्यांतील कथा व भौगोलिक स्थलें व त्यांचीं नांवें समजल्यावर, कांही प्रदेशांना जुळतील अशीं नांवें कित्येकांनीं दिलीं आहेत. एकाद्या टेकडीवर पाण्याचा झरा दिसला की तें सीतेचें स्नान-कुंड म्हणून झालेंच ! मोर्शी जवळील सालबर्डी टेकडीवर असें सीताकुंड आहे, तर तें रामटेकलाहि आहे ! गांवांचीं नामसादृश्यें अशी वाटेल तितकी दृष्टीस पडतात. किंवा मोठ्या शहरांचीं नांवें, लहानशा नव्या ठिकाणीं नव्यानेच उत्पन्न होतात, तसेंच निरनिराळ्या श्रीरामाच्या कथा प्रत्येक प्रांतांत तेथेच घडल्या म्हणून ऐकूं येतात. परंतु हें सर्व नवनिर्मित आहे; केवळ कल्पनाप्रवाह आहे. याची खरी कसोटी तें वाल्मीकिरामायणाशीं किती जुळतें ही आहे. नाहीतर श्रीरामाचा मार्ग पूर्वदक्षिणेचा, व गोष्टी सांगावयाच्या पश्चिमेकडच्या. विपर्यस्तता अशी झपाट्याने वाढली आहे. ढापेवाडा येथील विठ्ठलभक्तांनीं आपले घरामागेच पंढरपूर वसविलें आहे. आमच्या प्रांतांत तर कालीदासाची रामटेकीं, भवभूतीची आमगांवाजवळ, व गुणाढ्याची हिंगणघाट येथे योजना झाली आहे. मग सिंहलीलोक रामायणातील स्थलें आपल्या भूमींत आणतात यांत काय आश्चर्य ! हा मनुष्य-स्वभाव आहे; कल्पिलेलें भूत जवळच दिसतें. पण हें मूल रामायणाशीं मुळीच जमत नाही एवढें सांगितलें म्हणजे त्यांत सर्व आलें, वाल्मीकि रामायण गोदावरीचे मुखापर्यंतच आहे; पुढे नाही. श्रीराम तेथूनच सीतेसह परत गेले व राज्य करूं लागले.

अर्थात् लंका बेट गोदावरी मुखांत म्हणजे तेथील समुद्रांतच असलें पाहिजे !!!

●

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भृंगावर्तनी का पद्मावर्तनी ?

वि. ज. सहस्रबुद्धे, मिरज

★

छन्दोरचनाकार प्रो. माधवराव पटवर्धन हे दिवंगत झाले असल्याने आता करण्यांत येणारी चर्चा ही त्यांच्याकरता नसून छन्दःशास्त्रांत शक्य तर सुधारणा व्हावी या दृष्टीनेच करण्याची आहे व याचा निर्णय विद्वानांकडून होण्याचा आहे.

अनेक पद्यांचा तुलनात्मक विचार करीत असतां कोठे कांही शंका सहज उद्भवते व त्या शंकेसंबंधी अधिक संशोधन करावें असें वाटतें. हा लेख अशा प्रसंगामुळे लिहावा लागत आहे, एवढेंच आरंभीं नम्रपणें कळवावयाचें आहे.

अक्षरगणवृत्तें व जाति म्हणजे मात्रावृत्तें यांमध्ये भृंगावर्तनी, पद्मावर्तनी वगैरे पोटप्रकार कै. माधवराव यांनी दाखविले आहेत. वास्तविक पाहातां अक्षरगणवृत्तां-मध्ये अशा प्रकारचे भेद दाखविण्याचें बिलकुल कारणच नव्हतें. "आवर्तन" हा पारिभाषिक शब्द संगीतशास्त्रांतील आहे. जाति म्हणजे मात्रा–वृत्तें व ताल यांचा संबंध (कांही अपवाद वगळून) आहे व ताल–दृष्टीने विवक्षित मात्रा–वृत्त हें भृंगावर्तनी, पद्मावर्तनी, हरावर्तनी अथवा अग्न्यावर्तनी आहे हें सांगतां येतें व तसें सांगणें योग्य ठरेल, परंतु "आवर्तन" हा शब्द अक्षरगणवृत्तांसंबंधी वापरण्यांत आल्याने घोटाळा उत्पन्न झाला आहे.

प्रा. वि. म. कुळकर्णी यांनी "वृत्तें व अलंकार" या नांवाचें पुस्तक लिहिलें आहे. त्यांत "मराठी असे आमची मायबोली" या वागीश्वरी वृत्तांतील पद्याच्या गेयतेबद्दल खुलासा करतांना त्यांनी "मराठी असे आमची मायबोली" हे शब्द मागेपुढे केले तर तालावर म्हणतां येणार नाहींत असें म्हटलें आहे. अशा खुलाशाच्या वेळीं कै. माधवराव हे "ताल" शब्द न वापरतां "लय" असा शब्द वापरतात. ते म्हणतात कीः—

"शिखरिणी, शार्दूलविक्रीडित इत्यादि ज्या वृत्तांना "अनावर्तनी" असें म्हटलें आहे तीं वृत्तें ज्या रूढ घाटणीने म्हटलीं जातात त्या घाटणींत "लय" नाही हें कोणीहि गवई सांगूं शकेल." (लोकशिक्षण मासिक अंक जुलई १९१९)

याप्रमाणे कुलकर्णी हे "ताल" शब्द व माधवराव हे "लय" असा शब्द एकाच संदर्भात वापरीत असल्याने शंका येते. आणखी असें आहे की, कै. माधवराव यांनी "आवर्तन" हा शब्द वापरला असला तरी "ताल"-दृष्ट्या यथार्थ असा तो "आवर्तन" शब्द वापरला आहे असेंहि म्हणवत नाही.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आवर्तनी पद्य म्हणजे ज्यांत कांही ठराविक मात्रांच्या गणांचें आवर्तन जाणवतें, तें पद्य होय, अशी व्याख्या पद्य-प्रकाश पुस्तकांत त्यांनी दिली आहे. या व्याख्येवर आक्षेप घेतां येतो म्हणून त्याचें उदाहरण देतों.—

अक्षरगणवृत्त : मरालिका किंवा कामदा
जी वयांतला । योग्य भाव घे ॥
शान्ति द्यावया । व्यावया वधे ॥

या दोन चरणांतील प्रत्येकांत सोळा मात्रांचीं अक्षरें असून आठ आठ मात्रांचीं दोन आवर्तनें सरळ गणिताने होतात. परंतु हें वृत्त "पद्यावर्तनी" प्रकारांत निर्दिष्ट केलें नसून "भृंगावर्तनी" प्रकारामध्ये दाखविलें आहे. इतकेंच नव्हे तर चार मात्रांची भर घालून भृंगावर्तनी प्रकारांत बसविलें आहे त्याची मोडणी पाहा.—

जी व यां त ला यो ग्य भा व घे
[– ᵕ – ᵕ । – ऽ ऽ ऽ ऽ । – ᵕ – ᵕ । –]

या मोडणीवरून विचार केला तर ही मोडणी तालदृष्टीने बसविलेली असावी असेंच म्हणणें भाग आहे.

आता याच्या उलट परिस्थिति "भुजंगप्रयात" वृत्ताची दिसून येते. भुजंगप्रयाताच्या आवर्तनाची मोडणी पुढीलप्रमाणे दिली आहे.

म ना वा स ना दु ष्ट का मा न ये रे
[ᵕ – – । ᵕ – – । ᵕ – – । ᵕ – –]

परंतु ही मोडणी ताल-दृष्ट्या चूक आहे. तालाचीं आवर्तनें दाखवावयाचीं झालीं तर मोडणी दाखवावी लागेल ती अशी:—

[ᵕ । – – ᵕ । – – ᵕ । – – ᵕ । – –]
म ना वा स ना दु ष्ट का मा न ये रे

याच बाबतींत "मौक्तिक दाम" वृत्ताचें आणखी एक उदाहरण तुलनेसाठी देतों.

॥ किती बघ सिंन्धु भयंकर खोल ॥

हा चरण मौक्तिक दाम वृत्ताचा आहे. याचे अष्टमात्रिक दोन विभाग—

[ᵕ – ᵕ ᵕ – ᵕ । ᵕ – ᵕ ᵕ – ᵕ]
कि ती ब घ सिं न्धु भ यं क र खो ल

असे सरळ व सहज पडूं शकतात. परंतु तसे विभाग न पाडतां पहिलें लघु अक्षर बाजूस काढून त्याच्या पुढील अक्षरापासून खालीलप्रमाणे तीन भाग दाखविले आहेत.

[। – ᵕ – । – –]
कि ती ब घ सि न्धु भ यं क र खो ल

वरील विभाग तालदृष्टीनेच पाडले असावेत.

सांगावयाचा मुख्य मुद्दा असा की, मरालिका, भुजंगप्रयात व मौक्तिक दाम यांचीं आवर्तनें दाखवितांना एकच एक नियम लागू केला नाही असें स्वच्छ दिसतें. अर्थात् घोंटाळा उत्पन्न झाला आहे व आवर्तनाचें गमक कोणतें तें निश्चितपणाने कळत नाही.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

के. माधवराव " पद्य म्हणजे लयबद्ध " असें निक्षून सांगत असले तरी तालाचा विचार त्यांनी केलाच नाही असेंहि म्हणवत नाही. त्याचा स्पष्ट पुरावा दाखवावयाचा झाला तर पद्यप्रकाश पान १३ येथे उत्कृष्ट मिळतो.

॥ बहु असोत सुंदर संपन्न की महा ॥

हें पद्य धुमाळी तालांतील म्हणजे पद्मावर्तनी नसून भृंगावर्तनी आहे हें सिद्ध करतांना त्यांनी ताल-तत्त्वाचाच आधार घेतला आहे.

असो, " आवर्तन " या पारिभाषिक शब्दाच्या अर्थाबद्दल विवेचनाचा हा पूर्वभाग येथे झाला. आता भृंगावर्तनी का पद्मावर्तनी यासंबंधीं शंका घेण्यासारखीं कांही पद्यें दिसून येतात तेव्हा त्याबद्दल विचार करूं.

" आनंदकंद " या वृत्ताची मोडणी छन्दोरचना (प्रथम आवृत्ति) पान ५७ यांत—

– – ⏑	– ⏑ – –	– – ⏑	– ⏑ – –
आ नं द	कं द ऐ श	हा हिं द	दे श मा झा

याप्रमाणे दाखविली असून पद्यप्रकाश (पान ४६) मध्ये भृंगावर्तनी प्रकाराने आवर्तनें दाखविलीं आहेत तीं अशी—

–	– ⏑ – ⏑	– – –	– ⏑ – ⏑	– –
आ	नं द कं द	ऐ श हा	हिं द दे श	मा झा

ही परस्पर विसंगति आहे. अर्थात् अक्षरगण वृत्तांचे आवर्तनी व अनावर्तनी असे प्रकार करण्याची कल्पना पहिल्या प्रथम नसावी असेंच म्हणावें लागतें. नंतर पद्य प्रकाशमध्ये " आनंद कंद " हें भृंगावर्तनी म्हणून निर्दिष्ट केलें असलें तरी तें पद्मावर्तनी प्रकारांतहि चांगलें बसूं शकतें याला आधार मिळतो तो नमूद करतों.

प्रो. आचरेकरकृत " प्रार्थनागीत माला " या मध्ये.—

॥ हे मातृभूमि तुझिया चरणीं प्रणाम करतों ॥

हें पद्य अष्टमात्रिक तालांत दिलें आहे. तसेंच लक्ष्मण दत्तात्रेय दीक्षित कृत " संगीत शिक्षण क्रम " या पुस्तकांत.—

॥ गे थोर मातृभूमी आर्यें सुवर्णभूमी ॥

हें " आनंद कंद " याच चालीवरील पद्य अष्टमात्रिक तालांतच दिलें आहे. याबरून पाहतां " आनंद कंद " वृत्त किंवा " रसना " जाति

॥ रसने न राघवाच्या थोडी यशांत गोडी ॥

दोन्ही पद्यें पद्मावर्तनी प्रकारांतहि घालण्यास मुळीच हरकत नाही.

भृंगावर्तनी का पद्मावर्तनी अशी शंका ज्याच्याबद्दल येते असें आणखी एक पद्य देतों. तें म्हणजे " मोहिनी " जातीचें होय. हें पद्य छन्दोरचना (प्रथम आवृति पान १२२) ग्रंथामध्ये " भृंगावर्तनी " प्रकारांत दिलें असून पद्यप्रकाशांत " पद्मावर्तनी " प्रकारामध्ये घातलें आहे. असा फरक का केला याचा खुलासा कोठे दिला नाही. " मोहिनी " जातीलाच नंतर " महाराष्ट्र लक्ष्मी " असें बदलून नांव दिलेलें आहे " मोहिनी "चा एक चरण नमुन्याकरता घेऊन अधिक फोड करून पाहूं.

छन्दोरचनेंत लघुगुरूच्या खुणा खालीलप्रमाणे आहेत.

सोड सोड । आतां अपुल्या । गोड मोहि । नीळा
–⏑ –⏑ – – ⏑⏑ + –⏑ –⏑ ++

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पद्यप्रकाशमध्यें:—

महा राष्ट्र लक्ष्मी माते जगीं धन्य वाटे
ᵕ– । –ᵕ । – – –+ । ᵕ– । –ᵕ । –+

वरील खुणांमध्ये आवर्तनाचे विभाग बरोबर दाखविले नाहीत हा मोठा दोष दिसून येतो.

" मोहिनी " च्या चरणांमध्ये एकंदर अक्षरांच्या चोवीस मात्रा भरतात. या चोवीस मात्रांचे ' भृंगा ' च्या दृष्टीने चार विभाग पडतील व ' पद्मा ' च्या दृष्टीने तीन भाग पडूं शकतात (६ × ४ = २४ आणि ८ × ३ = २४ मात्रा) परंतु असे ढोबळ गणिताने विभाग पाडून चालणार नाही. संगीताच्या सुरावटीने व तालावर सदरहू पद्य म्हटलें असतां भरतीला अधिक मात्रा आलापाने भराव्या लागतात व आवर्तनेंहि वाढूं शकतात. अशा दृष्टीने या " मोहिनी " जातीच्या पद्यासंबंधीं विचार केला तर तें भृंगावर्तनी व पद्मावर्तनी अशा दोन्ही प्रकारांत देण्यासारखें आहे अर्थात दोन्ही प्रकारांमध्ये देण्यास मुळीच हरकत नव्हती. निदान पद्मावर्तनी प्रकारांत घातलें आहे त्या ठिकाणी " हें पद्य भृंगावर्तनी होऊं शकतें " इतकें टीप म्हणून ठेवणें आवश्यक होतें.

" एखादें पद्य हें अमुक एका आवर्तनाचेंच आहे आणि त्यांतील चरणांत आवर्तनारंभ हा अमुकच ठिकाणीं होतो असें कशावरून म्हणावयाचें तर इतर कोणत्याहि पद्धतीने त्याची मोडणी लावूं लागलों की गणान्ती अक्षरसमाप्ति होत नाही आणि उद्वेगजनक रीतीने शब्द तुटतात " अशी आवर्तन ओळखण्याची कसोटी कै. माधवराव यांनी सांगून ठेविली आहे.. पण ताल-तत्त्वाचे दृष्टीने ती कसोटी शास्त्रशुद्ध नाही. वादाचें मूळ या ठिकाणींच आहे. कवीने शब्द-रचना करतांना बरोबर शब्द-योजना केली नसेल व त्याला चालीची नीट कल्पना आली नसेल इतकें फार झालें तर ठरेल. वरील कसोटी लावून पाहातांना कसा घोटाळा उत्पन्न होतो तो पहा.

अग्न्यावर्तनी समवृत्तापैकी " व्योमगंगा " वृत्ताचीं आवर्तनें दाखविलीं आहेत तीं अशीं:—

[जा ति पु ष्पा । चा क रू नी । सा ज ये ती । कृ ष्ण राती]
– ᵕ – – – ᵕ – – – ᵕ – – – ᵕ – –
[मो हि नी ज्यो । ति र्म यी ती । जा ळि ना प्रे । मी प तं गा]
– ᵕ – – – ᵕ – – – ᵕ – – – ᵕ – –

वरील प्रमाणें प्रत्येक चरणांतील अठ्ठावीस मात्रांचीं चार आवर्तनें होतात परंतु " पुष्पांचा " " ज्योति " व " प्रेमी " हे तीन शब्द उद्वेगजनक रीतीनें तुटत असल्याने आवर्तनारंभ कै. माधवराव यांच्याच मताप्रमाणे चूक ठरतो की काय असा प्रश्न येऊन पडतो.

अग्न्यावर्तनी समजातीपैकीं " जीव कलिका " या पद्याचा एक चरण विचारार्थ घेऊं. तो चरण असाः—

[प री म ग जी । ब क लि का ही । अ का लीं फु लु । नि ये ई लऽ]
ᵕ – ᵕ ᵕ – ᵕ ᵕ ᵕ – – ᵕ – – ᵕ ᵕ ᵕ – – +

अशीं सात सात मात्रांचीं चार आवर्तनें पडूं शकतात. परंतु " जीव कालिका " व " फुलुनि " असे दोन शब्द उद्वेगजनक रीतीने तुटतात. तेव्हा कै. माधवराव यांची कसोटी तरी या ठिकाणीं चूक म्हणावी किंवा आवर्तनारंभ निराळ्या रीतीने पाडले

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पाहिजेत. कांही म्हटलें तरी आवर्तन ओळखण्याचें अथवा आवर्तन ठरविण्याचें तत्त्व बरोबर लागूं पडत नाही व घोटाळा उत्पन्न होतो हें स्पष्ट केलें आहे.

" आनंद कंद " व " मोहिनी " प्रमाणे " आत्मवंचना " जातीचें पद्यहि भृंगावर्तनी व पद्मावर्तनी अशा दोनी प्रकारांत बसणारें आहे असें दिसतें. त्याचा चरण असा—

॥ आकळे न अघटित घटना ॥ तव दयाघना ॥

या चरणामध्ये भरतीच्या मात्रा कोठें किती घालावयाच्या ही गोष्ट ज्या त्या तालाच्या आवर्तनावर अवलंबून राहील. मात्रा वाढवून घ्याव्या लागतात हें तत्त्व कै. माधवराव यांना मान्य असून तशा भरतीच्या मात्रा ऽ ऽ अशीं अवग्रह चिन्हें देऊन कित्येक ठिकाणीं त्यांनी दाखवूनहि दिल्या आहेत. खात्रीसाठीं त्याबद्दल तीन चार उदाहरणें देऊन ठेवितों म्हणजे समजण्यास सोय होईल.

१ ॥ जर — । ठें न विवाह क — । रावा ऽ ऽ ऽ ऽ ॥
॥ कधिं हि न जनकें । जरठ वरातें ।
॥ तनुजा देह वि — । कावा ऽ ऽ ऽ ऽ ॥ ध्रु० ॥
२ ॥ स्मरतां नित्य ह — । री ऽ ऽ मग ते ॥
॥ माया काय क — । री ऽ ऽ ॥
३ ॥ मार भ — । रारी ऽ ऽ चल । तोड बंधनें । सारी ॥ असो.

दोन तालांत रीतीने म्हणतां येणारीं पद्यें फारशीं आढळत नाहीत. दोनी तालांमधील मात्रा-गणास जुळणारे असे विशिष्ट मात्रांचे शब्द ज्या पद्याच्या रचनेंत स्वाभाविक-पणें आले असतील अशीं पद्यें अगदीं थोडीं मिळूं शकतील. अशा मिश्र स्वरूपाच्या पद्याविषयी कै. माधवराव यांनी विचार केला होता किंवा नाही हें सांगतां येत नाहीं. तथापि या मिश्र जाति-प्रकाराबद्दल निराळें प्रकरण देऊन विवेचन करणें आवश्यक होतें आणि तसें केलें असतें तर छन्दोरचनेच्या पूर्ततेंत उपयुक्त अशी भरच पडली असती असें मला तरी खास वाटतें.

टीप—वरील चर्चेस उपयोगी अशीं आणखी कांही उदाहरणें मागाहून दिसून आलीं तींहि येथे पुरवणीदाखल देऊन ठेवितों.

१ इंद्रवज्रा हें वृत्त " अनावर्तनी " म्हटलें आहे परंतु नऊ नऊ मात्रांचीं दोन आवर्तनें सरळ पडतात म्हणून या वृत्तास "आवर्तनी " म्हणण्यास हरकत दिसत नाही.

॥ ती इंद्रवज्रा ॥ म्हणिजे कवीने ॥
मात्रा नऊ मात्रा नऊ

२ अन्यावर्तनी समवृत्तांपैकी " मंदाकिनी " आणि " सुर निम्नगा " या वृत्तांची सप्तमात्रिक मोडणी—

[मं दा कि नी । मं दा कि नी । मं दा कि नी । मं दा कि नी]
[⏑⏑ – ⏑ – ⏑⏑ – ⏑ – ⏑⏑ – ⏑ – ⏑⏑ – ⏑ –]

अशी दाखविली आहे पण ती सदोष आहे. तालाच्या मात्रागणाचे दृष्टीने—

[सुर । निम्नगा सुर । निम्नगा सुर । निम्नगा]
[⏑⏑ – ⏑ – ⏑⏑ – ⏑ – ⏑⏑ – ⏑ –]

अशी आवर्तनाची फोड देणें योग्य झालें असतें.

३ " वल्लभा " जाति, मात्रा अठ्ठावीस व " कालगंगा " जाति, मात्रा सव्वीस. यांपैकी " वल्लभे " चीं पाडलेलीं आवर्तनें बरोबर वाटत नसून " कालगंगे " चीं आवर्तनें योग्य दिसतात. यावरील उदाहरणांबद्दल तज्ज्ञांनी विचार करून पाहावा.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठी वाङ्मयापासून माझ्या अपेक्षा

मा. ज. कानेटकर, संपादक " निःस्पृह " नागपूर.

(गोंदिया येथील साहित्यसंमेलनांत केलेलें भाषण. ता. ६-११-४८)

विषय व्याख्येचा श्लेष असा आहे की मराठी वाङ्मयाने स्वतःकडून ज्या न्याय्य अपेक्षा करणें शक्य आहे त्यांची पूर्ति झालेली नाही कारण अशी पूर्ति झालेली असती तर हा विषय चर्चेला घेण्याचें मुळीं प्रयोजनच नव्हतें.

★

विषयाची व्याख्या थोडी सदोष आहे

विषय वास्तविक " वाङ्मयापासून माझ्या अपेक्षा " एवढाच असावयास हवा होता. जी भाषा मला येत नसेल त्या भाषेंतील वाङ्मय मला (जर त्याचें भाषांतर, मराठींत उपलब्ध नसेल तर) असून नसून सारखेंच. पण मला एखादी भाषा येत असेल तर ती भाषा कोणतीहि का असेना माझी त्या भाषेंतील वाङ्मयापासून, मराठी वाङ्मयापासून, जी असावयाची तीच अपेक्षा असणार. निरनिराळ्या भाषेंतील वाङ्मयापासून निरनिराळ्या अपेक्षा असणारा प्राणी असूं शकेल हें मला तरी शक्य दिसत नाही. भाषा हें साधन आहे. वाङ्मय हा तयार जिन्नस आहे. या तयार जिन्नसाची रुचि मला कशी असलेली आवडेल हा प्रश्न आहे. मी मराठी भाषाभाषी आहे एवढ्याकरिताच " मराठी वाङ्मयापासून " असा शब्दप्रयोग असावा असें मी धरून चालतों; पण चुकूनहि आपल्येकडून गफलत होऊं नये म्हणूनच मला सुरवातीला स्पष्ट करावेंसें वाटलें की जगांतील यच्चयावत् वाङ्मयापासून माझ्या काय अपेक्षा आहेत तेंच मी आपणास सांगणार आहे; कारण या माझ्या अपेक्षा भाषेप्रत बदलणाऱ्या नसून मूलग्राही व सर्व भाषांना सम प्रमाणांत लागू पडणाऱ्या अशाच आहेत.

माणसापासून आपल्या काय अपेक्षा आहेत ?

जगांतील प्रत्येक प्राण्याच्या दृष्टीने तो तो प्राणी विश्वाचा केंद्रबिंदू आहे. मुंगी समजते की सर्व विश्व मुंग्यांच्या सेवेकरिता उभारलें गेलें आहे. सिंह, हत्ती, इतर श्वापदें, जलचर, नव्हे अगदीं चिलटें, ढेकूण हींसुद्धा असेंच मानत असावीं हें स्वाभाविक आहे. माणूस तर निःसंशय अखिल विश्वाला स्वतःचा गुलाम मानतो तेव्हा वाङ्मय हें सर्वस्वी मानव समाजाच्या उपयोगाचा एक जिन्नस आहे असें जर माणूस समजत असेल व त्याच दृष्टीने जर वाङ्मयनिर्मिती करीत असेल तर त्यांत मुळीच नवल नाही. वाङ्मय व माणूस यांचा असा अन्योन्य संबंध असल्यामुळे माणसापासून आपल्या काय अपेक्षा आहेत हें जर आपण ठरवूं शकलों तर वाङ्मयापासून आपल्या काय अपेक्षा आहेत अगर असाव्या याचें स्पष्ट दिग्दर्शन होण्यास पुष्कळच साहाय्य होईल.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ईश्वराने माणसाला विद्या दिली म्हणून आम्ही त्याला जनावरापेक्षा श्रेष्ठ मानतों असें आम्ही म्हणत आलों, पण ह्या सिद्धांताबरोबरच आम्ही हें लक्षांत ठेवावयास पाहिजे की विद्येचे तीन प्रकार आहेत. सुविद्या, अविद्या आणि कुविद्या. यांपैकी विशिष्ट माणसांत ज्या प्रकारची विद्या असेल त्याप्रमाणे तो माणूसहि असेल, देवहि असेल, राक्षस असेल किंवा एखादें भयंकर प्राणघातक जनावरहि असेल. यांपैकी माणसाची मूळ व उपजत प्रकृति राक्षस अगर भयावह जनावर बनण्याकडे असते हें आपण पाहतों. राक्षसीपणाला मुलामा देण्याचे नवनवे प्रकार शोधणें याला आपण सुधारणा Civilization असें गोंडस नांव देतों हा भाग वेगळा, पण आजचा माणूस पशुत्व व रक्षवृत्ति यांनी ठेचून भरलेला आहे हें आपणांस दररोज प्रत्ययास येत आहे. देवत्व व साधें मनुष्यत्व यांपासून पळून राक्षसी, तामसी व पशुवृत्तीला आलिंगन दिलेल्या या माणसांपासून आमची एकच अपेक्षा आहे की त्याने शक्यतोंवर लवकर माणुसकीचा मुक्काम गांठावा. आजकाल "मानवता धर्मावर' आम्हांला फार बोलावें लागतें यावरूनहि हेंच सिद्ध होतें. मानवसमाजाच्या अमर देशाच्या मोठेपणाचें हेंच मापहि आहे.

वाङ्मय कां निर्माण होतें?

माणसाने जनावर अगर राक्षस बनूं नये; निदान माणूस रहावें व शक्यतर देव बनावें ही आपली माणसापासून अपेक्षा आहे, हें लक्षांत घेतलें म्हणजे वाङ्मयाचा उगम कशांत आहे हें तावडतोब आपणांस कळेल. भिन्न माणसांची प्रगति भिन्न असते. पूर्वदत्त विद्या व तिच्यावर स्वतःच्या प्रयत्नाने घडविलेला संस्कार यांच्या सहाय्याने भिन्न व्यक्ति ज्ञानसोपानावर निरनिराळ्या पायऱ्यांवर उभ्या आहेत. कांही फार उंच चढलेल्या दिसतात. कांही अगदी खालच्या पायऱ्यांवर असतात. या सर्वांमध्ये सत्प्रवृत्त व्यक्ति असतातच. पुढे असलेल्या सत्प्रवृत्तांना मनःपूर्वक वाटतें की आपल्या पाठीमागे असणारांनी आपलेबरोबर यावें. मागे असलेल्या सत्प्रवृत्तांना मनःपूर्वक वाटतें की आपण पुढच्यांना गांठावें. या एकमेव ध्येयाने प्रेरित होऊन पुढे असलेले विद्वान मागच्यांना सल्लामसलत देतात. त्यांचें मार्गदर्शन करतात. तोंडच्या शब्दाने सर्वांनाच व पुढे येणाऱ्या सर्व पिढ्यांना आपला उच्चारलेला शब्द ऐकूं जाईल की नाही याची प्रत्येकाला शंका वाटते. शंका कशाला, उच्चारलेला शब्द हवेंत विरून जातो हें आपण पाहतोंच. तेव्हा या नश्वर जगांत उपलब्ध असलेल्या मार्गाचा अवलंब करून आपापल्या मार्गदर्शनाला चिरस्थाई स्वरूप देण्याचा जो प्रयत्न करण्यांत येतो त्यांतून वाङ्मय निर्माण होत असतें. दैवी संपत्तीमध्ये अधिक श्रीमान् असणाऱ्यांनी दैवी संपत्तीचा अभाव असलेल्यांना स्वतःच्या बरोबरीने श्रीमंत होण्याची सांगितलेली व लिहून ठेवलेली युक्ति म्हणजे वाङ्मय. खऱ्या वाङ्मयाचा हाच उगम व हेंच खऱ्या वाङ्मयाचें प्रयोजन.

जुनें निर्लेप वाङ्मय

जगांत अगदी प्रथम जें लिहिलें गेलें तें सर्व मार्गदर्शनात्मक वाङ्मय आहे. छापखाने, प्रकाशक व वाहतुकीचीं साधनें यांनी वाङ्मयाचा व्यापार करण्याची शक्यता निर्माण होण्यापूर्वीपावेतोंहि वाङ्मय म्हणजे मुख्यत्वें मार्गदर्शनात्मकच राहिलें, याचें कारण स्पष्ट आहे. प्रसिद्धीकरणाचीं सुलभ साधनें व त्याबरोबरच मिळणारें द्रव्य हें कांहीहि नसतांना "मोलें घातलें रडाया, नाही आसूं आणि

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

माया " या जातीचें वाङ्मय लाहलें जाण्याचा संभव फार कमी होता. सत्प्रवृत्ति, दैवीसंपत्ति, भूतदया, परोपकारबुद्धि, अज्ञानांत व कुमार्गांत लोळणाऱ्यांबद्दलची अनुकंपा व त्यांचा उद्धार व्हावा अशी मनोमय इच्छा यांनी मनांत काहूर माजवून कल्होळ उठविला व त्यामुळे झोंपसुद्धा येईनाशी व्हावी अशी निदिध्यासात्मकवृत्ति बनली म्हणजे त्यांतून पुढे वाङ्मयाचा साक्षात्कार निर्माण होई, इतक्या एकाग्रतेने निर्माण होणाऱ्या वाङ्मयाला लोकाभिरुचीची जाणीव अगर धाक बाळगण्याचें कारण नसे. " लोहपरिसाशीं रुसलें, सोनेपणाशीं मूकलें " अशा वृत्तीने तें वाङ्मय निर्माण होई. वाङ्मयाची ही जात नक्की असल्यामुळे त्यावेळीं वाचकांचेहि दोनच प्रकार असत—नव्हे एकच प्रकार असे. जे सत्प्रवृत्त असत व ज्यांना आत्मोन्नति हवीशी वाटे असेच लोक अत्यंत भाविकपणें, नम्रतापूर्वक वाङ्मयसेवन करीत. ज्यांना स्वतःच्या पापाचरणांचे ऐहिक लाभ सोडावेसे वाटत नसत व त्यांकरिता जे आपला कुमार्ग टाकण्यास तयार नसत ते वाङ्मयाच्या कधीच वाटेला जात नसत. ते त्याकडे पूर्णपणें दुर्लक्ष करीत. पापाचरणाचे दुष्परिणाम भोगावे लागून पश्चात्ताप झाला म्हणजेच ही मंडळी वाङ्मयाकडे लक्ष देत. म्हणजे जुन्याकाळीं वाङ्मयाचा एकच प्रकार उपलब्ध होता. तो म्हणजे उपकारी मार्गदर्शनात्मक वाङ्मयाचा. वाचकांचाहि एक प्रकार उपलब्ध होता. तो म्हणजे आत्मोन्नति साधूं इच्छिणाऱ्या सत्प्रवृत्त भाविकांचा. आजच्या जातीच्या टीकाकाराचा अजून उगम झाला नव्हता. एखाद्या तत्त्वज्ञाने सांगितलेला मार्ग चुकीचा आहे, त्यापेक्षा आपणांस जास्त चांगला मार्ग माहित आहे असें जेव्हा एखाद्याला वाटे तेव्हा तो निराळा मार्ग सांगे. यामुळे पर्याय अगर भिन्न सिद्धांत सांगण्यांत येत. उ. षड्दर्शन. पण त्यांतहि कोणत्याहि तत्त्वज्ञाने दुसऱ्या तत्त्वज्ञांची अवहेलना केल्याचें अगर आजसारखी टीका केल्याचें उदाहरण नाही. जिज्ञासावृत्ति, मार्गशोधनाची उत्कट इच्छा व मार्गदर्शन व्हावें हा एकमेव उद्देश या पातळीखाली जुनें वाङ्मय कधीहि उतरलें नाही. त्याला भ्रष्ट होण्याची गरज अगर परिस्थिति निर्माण झाली नाही.

लोकाभिरुचि व वाङ्मय

वाहतुकीचीं साधनें वाढलीं म्हणून समाजाची व्याप्ति वाढली. त्यामुळे अधिक लोकांशीं संपर्क ठेवण्याची गरज निर्माण झाली. त्यामुळें उपकारक वाङ्मय जास्त लोकांना पोचविण्याची युक्ति काढावी लागली. म्हणून छापखाने निघाले. पुढे छापखान्यांना कामाची गरज वाटली म्हणून लिहिण्यासारखें नसले तरी लिखाणांची मागणी निर्माण झाली व अशा प्रकारें प्रसिद्धीचीं यंत्रें व लिखाण व लेखक यांच्यांत शर्यत सुरू होऊन घाल पीठ, घाल पाणी असें करीत करीत आम्हीं पराकाष्ठेच्या पांचट वाङ्मयाच्या महासागरांत सापडलों असून जीव कासावीस होऊं लागला आहे. म्हणूनच आजपासून अनेक वर्षांपूर्वी टॉलस्टॉयला असें म्हणावें लागलें कीं पुस्तकांचा दर्जा इतका निकृष्ट झाला आहे कीं हजारों पुस्तकें ओलांडल्यावर मोठ्या प्रयासाने उन्नतीला व खऱ्या आनंदाला निर्माण करणारें पुस्तक आढळतें. या काळांतच वाङ्मय व लोकाभिरुचि यांच्यांत कुस्ती सुरू झाली व त्यांतून वाङ्मयाचे दोन स्पष्ट वर्ग पडले. लोकाभिरुचीला योग्य मार्गावर ठेवण्याचा प्रयत्न करणारें वाङ्मय व लोकाभिरुचीची गुलामी पत्करणारें वाङ्मय. यामुळेच लेखकांचेहि दोन वर्ग पडले. पहिला तत्त्वनिष्ठांचा व दुसरा लोकमतानुवर्ती लेखकांचा. पहिले व्यवहारशून्य समजले जाऊं लागले, दुसरे प्रथितयश मानले जाऊं लागले.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाङ्मयाच्या उपशाखा

अर्थात् तत्त्वनिष्ठांमध्ये पोटजाति निर्माण होणें शक्य नाही. पण लोकाभिरुचीची गुलामी पत्करणारांत श्रेणी पडूं लागल्या. आधिभौतिक उन्नतीच्या जो जास्त पचांत गेला व ज्याने निलाजरेपणाचा मोठा घास गिळला त्याने लोकाभिरुचि बिघडवून आधीच बहकलेल्या माणसाच्या माकडाला आपल्या वाङ्मयाची दारू पाजण्यास सुरवात केली. ज्यांना थोड्याफार प्रमाणांत संकोच होता असे लोक 'वास्तववादी वाङ्मय लिहून समाजचित्रण करून तटस्थाची भूमिका घेऊं लागले. त्यांचें म्हणणें असें, " हें पाहा समाज असा आहे. परिस्थिति अशी आहे. तुम्ही तुमची निवड करा व योग्य दिसेल तसें वागा. " या लेखकांनी मार्गदर्शनाची कटुताहि टाळली तसेंच ते बहकवण्याच्या जबाबदारीपासून वेगळे राहिले. म्हणजे सरांशाने थोडक्यांत आम्हाला वाङ्मयाचे खालील भेद मानतां येतील—

उपकारी किंवा मार्गदर्शक आणि लोकाभिरुचीची गुलामी पत्करलेलें

- वर्णनात्मक अमर वास्तववादी
- कल्पनाप्रचुर आत्मसमर्थनपर अधोगामी अगर अजागलस्तनवत् किंवा थिल्लर

प्रत्येक लेखक स्वतःच्या वाङ्मयाचा नायक असतो

यापैकी वस्तुस्थितीदर्शक व वर्णनात्मक वाङ्मय घटकाभर क्षम्य मानतां येईल कारण या वाङ्मयांत लेखकाने आपलें मत (Casting vote) दिलेलें नसतें व प्रत्येक वाचकाला स्वतः कसें वागावें याची निवड करण्याचें पूर्ण स्वातंत्र्य असतें. या मर्यादेपलीकडील दिशाभूल करणारें जें वाङ्मय निर्माण होतें त्याची मीमांसा जशी स्पष्ट तशीच मनोरंजकहि आहे.

अहंकाराने मुसमुसलेला प्रत्येक मनुष्य स्वतःस विश्वाचा मध्यबिंदु मानतो हें प्रथम सांगितलेंच आहे. यामुळे नकळत प्रत्येक लेखक हा आपल्या समग्र लिखाणांतील अनुस्यूत नायक असतो. " आढ्योभिजनवानास्मि कोन्योस्तिसदृशोमया " ही भूमिका घेतलेल्याला स्वतःच्या सर्व दोषांचें समर्थन करण्याचा मोह अनावर होतो. या दोषसमर्थनाच्या ऊर्मीतून सर्व अनुपकारक वाङ्मय तयार होतें. कोणत्याहि प्रकारें शेपूट तुटलेला लेखक " आपापलीं शेपटें तोडून घ्या " असा प्रचार करणारें वाङ्मयच प्रसवणार. यामुळे आता कोण लिहील याचा नेम उरला नाही. पूर्वी उन्नतीच्या मार्गावर अधिक पुढे असणारानेच मागच्यांना मार्गदर्शक होईल असेंच वाङ्मय निर्माण करावें असा जो संकेत असे तो जाऊन ज्ञानसोपानाच्या दोन्ही टोकांना आता वाङ्मय निर्माण होऊं लागलें आहे. सर्वांत खालच्या पायरीवर असणारेहि पुढे दिसणाऱ्या व वर गेलेल्या लोकांनी सर्व पायऱ्या उतरून या मागच्यांच्या बरोबरीत यावें असा जोराचा प्रचार करीत आहेत. यामुळे ज्ञानसोपानावर दोन्ही टोकांनी दोन संपत्तींमध्ये दैवी व आसुरीरस्सीखेच सुरू आहे. अर्थात् यामुळे जनतेंतहि दोन स्पष्ट पक्ष आहेत. आसुरी संपत्ती तात्काळ फलदायक असल्यामुळे साहजिकच आज वाङ्मयक्षेत्रांत तिचें थैमान सुरू आहे. वाङ्मयाची मार्गदर्शकाची भूमिका अत्यंत अस्पष्ट झाली आहे व जिज्ञासू व आत्मोन्नतीबाबत उत्सुक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असणारा वाचक मात्र कल्पनातीत गोंधळांत सापडला आहे. वाङ्मय म्हणजे आज आयुष्याची पाऊलवाट उरलें नसून त्याने दाट झाडीचें स्वरूप घेतलें आहे. यांत शिरणाऱ्या वाचकाला मार्ग तर दिसत नाहींच. त्याला स्वतःलाच मार्ग काढावा लागतो आणि वर कांटेरी झुडुपांचे ओरखडेहि त्याला सहन करावे लागतात.

आता माझ्या अपेक्षा स्पष्ट झाल्या असतील.

एवढी चर्चा झाल्यानंतर आपणांस माझ्या अपेक्षा पुरेशा स्पष्ट झाल्या असतील. तरीहि त्या क्रमवारीने मी आपणांस सांगतों—

१. मराठी वाङ्मय माझ्या माणुसकीचा दर्जा वाढविण्यास मदत करील अशी माझी अपेक्षा आहे.

२. मराठी वाङ्मय माझा बुद्धिभेद करणार नाही अशी माझी अपेक्षा आहे

" नबुद्धिभेदंजनयेदज्ञानां कर्मसंगिनाम् "

३. " अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितंच यत् " या परीक्षेला मराठी वाङ्मय उतरेल अशी माझी अपेक्षा आहे.

४. मराठी वाङ्मय मराठी भाषाभाषीयांत परस्पर सहिष्णुता, सद्भाव, सहानुभूति व प्रेम निर्माण करील अशी माझी अपेक्षा आहे.

ही अपेक्षापूर्ति लेखकांचे स्वाधीन आहे.

वाङ्मयापासून माझ्या ज्या अपेक्षा आहेत त्या स्वयंभू पूर्ण होणार नाहीत. त्या अपेक्षा पूर्ण होण्याची आशा वाङ्मय निर्माण करणाऱ्या लेखकांकडूनच आहे सबब वरील दर्जाचें वाङ्मय निर्माण करण्याची पात्रता असणाऱ्या लेखकांत मी कशाची अपेक्षा करतों हें सांगितल्याशिवाय सदर विषय पूर्ण झाला असें म्हणतां येणार नाही.

(अ) आजच्या सामान्य लेखकाला यंत्रयुगाने पूर्णपणें गिळून टाकलें आहे किंवा ग्रासून टाकलें आहे. आता लेखक हा घाण्याला जुंपलेल्या बैलासारखा बनला आहे. अभिरुचि बिघडलेल्या वाचकांनी मागणी करावी, सदर मागणी यंत्राच्या मालक असलेल्या प्रकाशकाने ऐकावी व इच्छेस येईल तें वाङ्मय लिहून तयार करण्याचा हुकुम लेखकाला द्यावा असा आजचा सामान्यक्रम आहे. लिखाणाची पोतडी बगलेत मारून प्रकाशकांचे उंबरठे झिजविणारा लेखक हें दृश्य कांही दिवसांपूर्वीपावेतों फारच सामान्य होतें. आज थोडें हें प्रमाण कमी झालें आहे पण याचें कारण असें आहे की भिकार वाङ्मयाची मागणीच पुरवठा करणाऱ्यांच्या कक्षाच्या पलीकडे जाऊन बसली. दारूबाजाला एक पेला पचूं लागला म्हणजे त्याला जसे दोन पेले लागतात तशीच कांहीशी गत आमच्या वाचकवर्गाची झाली आहे. अशा प्रकारें स्वतःस सर्वस्वी लोकाभिरुचीचा, यंत्रयुगाचा किंवा प्रकाशकांचा गुलाम बनणारा लेखक मार्गदर्शक अगर उपकारी वाङ्मय कधीच निर्माण करूं शकत नाही म्हणून वाङ्मय निर्माण करणाऱ्या माणसापासून माझी एकमेव अपेक्षा अशी आहे की तो स्वतःची लेखणी कोणत्याहि प्रलोभनाला बळी पडून विकणार नाही.

वरील एकमेव अट पाळल्यास आज लेखकांत जें चुरशीचें, मत्सराचें, विरोधाचें, बदनामीचें, अप्रेमाचें व सारांशाने माणुसकीच्या भयंकर अभावाचें वातावरण दिसतें आहे त्याला आपोआपच आळा बसेल. ज्ञानाची विक्री सुरू झाली की ज्ञान भ्रष्ट झालेंच. आज आमचें वाङ्मय भ्रष्टतेच्या मार्गावर जोराने चालू आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठी भाषेंतील वाङ्मयाने या बाबतींत विशेषच चमक दाखविली आहे. लालित्याच्या परिपोषाला मराठी भाषा फारशी चांगली नाही असें पुष्कळांना वाटतें पण शिवीगाळ करण्यास तिचा रुक्ष व बोचकपणा फारच उपयुक्त ठरतो व दुर्दैवाने हा प्रयोग आमचेकडे फारच मोठ्या प्रमाणांत व फार खालच्या हीनदर्जाच्या पातळीपावेतों जाऊन करण्यांत येतो असें मोठ्या खेदाने म्हणावें लागतें. मत्सर, विरोध व वैमनस्य यांबाबतींत आम्ही कोणतीहि मर्यादा मान्य करीत नाही या सर्वांमुळे वाङ्मयाचें मूळचें आल्हाददायक असावयास हवें तें क्षेत्र अत्यंत तापदायक होऊन बसलें आहे.

वरील सर्व परिस्थिति बदलून मराठी वाङ्मयाने जीवनकलहांत थकलेल्या वाटसराला आल्हाद व तकवा प्राप्त करून देणाऱ्या उद्यानाचें स्वरूप द्यावे अशी माझी अपेक्षा आहे. सामान्य व्यक्तीला वाङ्मयसेवकाची भेट झाली म्हणजे आपणांस एक हितचिंतक, ज्ञानी, सहानुभूति बाळगणारा खात्रीलायक वाटाड्या मिळावा अशी भावना निर्माण झाली पाहिजे. हा वाटाड्या जर प्रत्यक्ष न मिळाला व त्याने लिहिलेलें एखादें पुस्तक मिळालें तरीहि तीच भावना निर्माण झाली पाहिजे.

एवंच, मराठी वाङ्मयाने माझा जीवनपथ प्रकाशित करणाऱ्या दिव्याची भूमिका घेऊन जीवनांतील खाचखळगे काटेरी कुंपणें इत्यादिपासून माझें रक्षण करावे अशी माझी अपेक्षा आहे. त्याने माझ्या कष्टी जीवाला समाधानाचे शब्द सांगणाऱ्या मित्राची भूमिका घेतली पाहिजे, मी जर पाप करण्याच्या विचारांत असेन अगर नीतिभ्रष्ट होण्याच्या विचारांत असेन तर मला भ्रष्टतेपासून वाङ्मयाने वांचवावे अशीहि माझी अपेक्षा आहे. नीतीच्या कल्पना तुलनात्मक असतात सबब जगांत शुद्ध नीतिमान अगर अनीतिमान असें कांहीच नाही असें बुद्धिभेद करणारें तत्त्वज्ञान सांगून माझी दिशाभूल करूं नये अशी माझी अपेक्षा आहे. थोडक्यांत माझी अशी अपेक्षा आहे की माझ्यामधील पशुवृत्ति जेव्हा जेव्हा माझ्यावर विजय मिळवून मला पशुतुल्य बनविण्याचा प्रयत्न करील तेव्हा तेव्हा मराठी वाङ्मयाने रक्षण करून मला माझी माणुसकी राखण्यास सहाय्य करावें व मला देवत्वाचे जवळ जवळ नेत असावे. मानवी समाजाचें अधःपातापासून शक्य तर रक्षण करा. वाङ्मयसेवकच प्रमुखत्वें आजच्या अधःपाताला कारणीभूत आहे असें म्हटलें तर आपणांस चीड येईल पण ती वस्तुस्थिती आहे. ज्या वाङ्मयाच्या वातावरणाचें बाळकडू मिळेल त्याला अनुरूप अशीं माणसें तयार होणार. यांच्यापैकीच कांहीवर जगाचा कारभार चालविण्याची जबाबदारी येणार. या सर्वांनी जगावर जो अधःपात लादला तो वाङ्मयामुळे नाही असें कसें म्हणतां येईल ! पण तें असो. जर आम्ही स्वतःस लेखणीबहादूर म्हणवीत असूं, आमच्या लेखणीच्या प्रभावशालित्वावर जर आमचा प्रामाणिक विश्वास असेल तर निदान हा अधःपात थोपविण्याचा तरी आम्ही प्रयत्न करूं या. जर आम्हांला यश मिळणार नाही तर आमचा लेखणीबहाद्दर असण्याबद्दलचा सर्व अभिनिवेश झूट आहे असें मी तर खास म्हणेन. ही माझी मूलग्रामी अपेक्षा आहे. वाङ्मयच कां, आमच्या प्रत्येक आचारविचारापासून, आमच्या श्वासोच्छ्वासापासून माझीच नव्हे तर अखिल मानव समाजाची एकच अपेक्षा आहे. ती म्हणजे—

सर्वेऽत्र सुखिनः संतु सर्वे संतु निरामयाः
सर्वे भद्राणि पश्यंतु माकश्चिद्दुःखमाप्नुयात् ॥

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या माझ्या अपेक्षा पूर्ण करणारीं मराठी पुस्तकें मला फारच थोडीं आढळतात म्हणून या प्रचंड सभेंत माझ्या इतकें कमी वाचन केलला माणूस आपणांस सापडणार नाहीं. आपण मला वाङ्मयक्षेत्रापैकीं एक का मानतां तें मला कळत नाहीं. कारण मी वर वर्णन केलेल्या जातीचें वाङ्मय निर्माण करण्याची माझी कितीहि तीव्र इच्छा असली तरी अजून मी लिहिलें नाहीं. अजून मी जिज्ञासू आहे, वाट चांचपडत आहे. असें असूनहि आपण मला माझे विचार आपले समोर मांडण्याची संधि दिली याबद्दल मी आपले आभार मानतों.

———

पहिला धडा [पृष्ठ ८० वरून चालू]

पण लगेच तिला वाटे, छे! उगाच संशय येतो मला... ! त्या गेल्या प्रसंगापासून एकदा तरी बोलले का ते मला...मग ते आजकाल असे वागतात ते का ! मनांत कुढत राहिल्यापेक्षा एकदम सरळ बोलून टाकलेलं बरं नाहीं का ... ! ...

'अमृतमंथन' मध्ये जसा राजगुरूचा डोळा प्रत्येक कोनाकोपऱ्यांतून पाहात होता त्याप्रमाणे प्रत्येक दिशेकडून सुहास आपल्याकडे पाहतो आहे असं कमलला वाटूं लागलं होतं. जेवतांना, आपल्या प्रत्येक घासाकडे कुणीतरी टवकारून बघत आहे अशी शंका येतांच आपल्याला जेवण जात नाही तसं कमलचं घरगुती कामांत होऊं लागलं होतं!

सुहासचा शर्ट धोब्याकडे टाकतांना हाताच्या सोन्याच्या गुंड्या तशाच राहून गेल्या. सुहासचं चुकून घरीं राहून गेलेलं पैशाचं पाकीट आपण उचलून आपल्या आलमारींत ठेवलं हें सुहासनं पाकीट शोधून काढीपर्यंत सांगायचं विसरली. सुहासची खोली साफ केल्यावर वस्तू जागच्या जागीं ठेवायच्या राहून जात.

असल्या लहान सहान गोष्टींनी सुहासचें माथं आजकाल भडकून जात असे. परंतु आपल्या मनांत कसलं थैमान घालतं आहे याची दाद तो प्राणी लागूं देत नव्हता. कमलनं निर्वोलक्याचं व्रत घेतलं होतं. सुहासनं कांहींहि आरोप केले तरी मुकाट्यानं ऐकून घ्यावेत, आपलं चुकलं नसलं तरी उलटून बोलूं नये, धडधडीत अन्याय होत असतांनाहि मुकाट्यानं अश्रू ढाळायचं आर्य स्त्रियांचं व्रत तिनं धारण केलं होतं.

परंतु आपल्या असल्या तन्हेवाईक वागणुकीमुळं दोघांतलं अंतर हलुहलु वाढत आहे याची त्यांना कल्पना नव्हती.

एक दिवशीं ऑफिसांत त्याला बराच त्रास झाला होता. "इन्स्पेक्टर जनरल ऑफ सिव्हिल हॉस्पिटल्स" पहाणी करायला येणार होते म्हणून सकाळीं थोडंसं खाऊन जावं लागलं होतं. दिवसभर खपून सर्व रेकॉर्ड नीट लावून ठेवावा लागला होता. वाटेंत जातांना वहाणेचा अंगठा तुटून बोटाला जबरदस्त ठेच लागली होती. तें बोट आता ठसठसूं लागलं होतं. वाऱ्यानं फडफडणारं धोतर चेनखाली सापडून फाटलं होतं. जणु साऱ्या अडचणींनी आजच त्याच्या भेटीला जायचं ठरविलं होतं !!

आणि अशा स्थितींत सुहास सायकलवरून घरीं येत असतांना त्याला एक व्यक्ती भेटली. आणि ती व्यक्ती म्हणजे सिनेमांत कमलशीं बोलणारा तरुण !! त्याच्या कपाळाला आठ्या पडल्या. कांहीं कारण नसतांना सुहासनं आपलं मन

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्याच्या विरुद्ध कलुषित करून घेतलं होतं. त्या तरुणाच्या हातांत आज एक बॅग होती. त्या बॅगवर " हायजिनिक प्रॉडक्ट्स् " असं नांव लिहिलेलं दिसत होतं. तो त्या कंपनीचा फिरता प्रचारक होता. सुहासच्या मनांत नकळत संज्ञाप्रवाह सुरू झाला होता. कमल नि तो तरुण या दोनच व्यक्ती त्याच्या मनांत निरनिराळ्या भूमिकेंत थैमान घालूं लागल्या.

त्या एकंदर वातावरणानं त्याचं मत आणखीच वाईट झालं. कसाबसा तो घरीं आला. कपडे उतरवून बाथरूममध्ये शिरतांच दाराशीं ठेवलेल्या चहाच्या उष्ट्या कपाला त्याचा पाय लागला नि त्याची दांडी फुटली. ठेच लागलेल्या बोटांतून रक्त वाहूं लागलं. त्यानं संतापानं पाहिलं. दोन पोह्याच्या बशा नि दोन चहाचे कप– ! कुणाला तरी पाहुणचार घडला होता. कोण बरं आलं असेल ... ? मनाच्या सवयी-प्रमाणे तर्क सुरू झाले होते. आणि त्याच्या त्या शोधाशोधीचं उत्तर म्हणून त्याच्या मनानं मघाच्या त्या तरुणाचं दर्शन घडवलं.

न बोलतांच तो पाटावर येऊन बसला. थर्मासमधून चहा ओतून कमलनं त्याच्यापुढं कप ठेवला. कप वाकून ठेवत असतांनाच पायाच्या निळ्याकाळ्या झालेल्या बोटाकडे तिचं लक्ष गेलं. काय लागलं म्हणून विचारावं असं तिला वाटलं. पण न जाणो नीट उत्तर मिळालं नाही तर ! दोघांतलं अंतर वाढत होतं याचं निदर्शक हीच भीति होती. मनानं तिनातिनदा विचार विचार म्हटलं पण ओठ विलग झाले नाहीत.

चहा गरम असेल म्हणून सुहासनं बशींत ओतून तोंडाला लावला. पण तो अगदी थंड पाहून त्याचं पित्त भडकलं. थर्मासच्या जुन्या झालेल्या बुचांतून वाफ बाहेर निघून जात असेल याची कमलला कल्पना नव्हती. सुहासनं जागच्या जागींच तो चहा ओतला. ज्वालामुखींतून लाव्हा बाहेर पडावा तसं त्याचं तें बोलणं !

" ...... नवरा म्हणजे बिनपगारी गडी वाटतो तुम्हाला–थंड, शिळं, पातं ते त्याच्या डोंबल्यावर घालावं. बाहेरच्यांच्या सत्कारांत मात्र उणं दिसूं देऊं नका म्हणजे झालं. आला असेल कुणी माहेरच्या कळवळ्याचा–मग कशाला नवऱ्याची आठवण राहील. आज इतके दिवस बघतोंय मी. मी म्हणतों कामांतून लक्ष उडायला झालं काय तुला ... ? ...

...... कोण आलं होतं घरीं ? अं ? असेल त्या दिवशीचा रंगेल गडी– भलतींसलतीं औषधं नि साधनं विकायचा त्याचा धंदा– खबरदार तो पुन्हा या घरांत आला तर... ... ताईच्या नात्यानंच शिरकाव करतात असलीं माणसं...... "

ताड् ताड् तोंडाला येईल तें तो बकत होता. खुंटीवरचा कोट खसकन् ओढून तो बाहेर पडला. तलावावरील गार वारे सुटले होते तिकडे मस्तक थंड होईल या विचारानं तो गेला. कपाळावरचा घाम पुसायला त्याने रुमाल पाहिला तो सापडेना म्हणून कोटाकडे त्याचें लक्ष गेलं. धुवायला काढून ठेवलेला तो कोट होता. आजू-बाजूला कुणी पहात नाही अशी खात्री करून घेऊन त्यानं सदऱ्याच्या पुढच्या भागानं आपलं कपाळ टिपलं. शुक्रवार तळ्याच्या बोटिंग क्लबमध्ये जाऊन चौकीदाराकडून त्यानं एक बोट घेतली. दोन तीन झपाझप वल्हीं मारून तो भर पाण्यांत आला आणि त्यानं ती बोट नि आपले विचार वाहतील तसें वाहूं दिले.

वल्ह्यांनी निर्माण झालेल्या तरंगावर बोट हळू हळू सरकत होती. पण विचा-रांची गती अनाकलनीय होती. त्याला वाटत होतं खरंच का बायका इतक्या चंचल

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असतात ! एखाद्या फुलाचा मध खूप शोषून ध्यायचा अन् मग दुसरं ताजं फुल दिसतांच तिकडे जायचं—भ्रमराचं जीवन जगायचं ! !

निदान माझी कमल तशी नाही या विचारानं मी किती सुखी होतो ! पण आजकाल कमलनं असं काय मांडलें आहे ! की मीच आंधळा होतों इतके दिवस ? जें पत्र आपण खोटं होतं असं समजत होतों तें खरं होतं तर !

उघडलेल्या पुस्तकाचीं पानं वाऱ्यानं भरभर उघडावींत त्याप्रमाणे त्याच्या आठवणीचीं पानं परतलीं नि एक विशिष्ट पान त्याच्यासमोर उघडं झालं.

...साधारणपणें सात आठ महिन्यापूर्वीचा प्रसंग होता तो. आणखी आठ दिवसांनी लग्नाचा दिवस होता ! कुणी अनामिक हितचिंतकानं (!) कमल-विषयीच्या भलभलत्या कंड्या असलेलं त्याला पत्र पाठाविलं होतं. दोन दिवस तो सुन्न होता. मग विचार करून त्यानं कमलच्या वडिलांची भेट घेतली. कमलशीं जरूरीची खाजगी भेटायची परवानगी घेऊन त्यानं तिला म्हटलं,

तूं अगदी खरं सांग ! हे सारं खरं आहे असं तूं सांगितलंस तरी मला कांही वाटणार नाहीं. फक्त मी तुला विचारीन की यापुढे तूं माझ्याशीं इमानानं वागायला तयार आहेस का ?... आणि तसं नसेल तर... माझं भाग्यच म्हटलं पाहिजे. ...

" मी अगदी धुतल्या तांदळासारखी आहे हो !! —" तिनं स्फुंदत स्फुंदत उत्तर दिलं होतं. कमलला रीतसर पहायला आपण गेलों त्या वेळेपेक्षा ती आताच जास्त सुंदर दिसते असंहि त्याला वाटलं होतं. त्याच्या रखरखीत हातावर तिनं आपला रक्तवर्ण हात ठेवला. काळसर जमीनीवर रेशमी गोफ दिसावा तसं तें दृश्य !! वचन देऊन तिनं आपल्या पवित्रतेची साक्ष पटवली होती....

आज मात्र सुहास अगदी तिऱ्हाइताच्या नजरेनं त्या प्रकाराकडे पाहात होता. हें सारं खरं असेल का...? की स्त्री ही जन्मजातच अभिनयसम्राज्ञी असते हें खरं... की...

त्या वावटळींतच तो गिरक्या घेऊं लागला. त्याची बोट आता खूप हलायला लागली होती. भानावर येऊन त्यानं पाह्यलं, पश्चिमेकडचं आकाश काळंभोर होऊं लागलं होतं. काळ्या ढगांच्या लाल कडा पाहून एखादा कोल्हा आपलं रक्तानं भरलेलं तोंड चाटीत उभा आहे असं त्याला वाटलं. लवकरच त्यानं कांठ गाठला नि घराची वाट पकडली.

त्यानं वर पाह्यलं, स्वयंपाकघरांत फक्त दिवा होता. बाकीच्या खोल्यांत अंधा-राचं राज्य होतं. दड्दड् जिना चढून गेल्यामुळे त्याला दम लागला होता. स्वयंपाक-घरांत त्याचं लक्ष गेलं अन् तो दचकला.

चुलींत केव्हांतरीं पेटत घातलेलीं लाकडं बाहेरपर्यंत जळून गेलेलीं होतीं. मोरीजवळ कमल ग्लानी येऊन पडली होती. तिला वांत्या झालेल्या होत्या. सुहासला तें सारं पहातांच धस्स झालं. माझ्या बोलण्यावर रागावून हिनं कांही भलतं सलतं तर खाल्लं नसेल ! त्यानं तिच्या मानेखालीं हात घालून किंचित् बसतं केलं आणि पाणी शिंपडलं. तो थंडगार स्पर्श होतांच ती सावध झाली. सुहासनं तिचा चेहरा कोरडा केला. ती पूर्ण भानावर आली. त्याला पाहतांच ती उठूं लागली. सुहासनं तिला आवळलं.

" कमा ! कमा !! काय होतंय तुला ? मला सांगायचं नाही का ? कमा !

 चुकलों मी, तुला भलतं सलतं बोलून बसलों. कमा ! माझी कमलिनी— "

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तिला हुंदका आला. तिला खरोखर काय होत आहे हें येरवीं सांगतांना तिला आनंद झाला असता, पण सुहासची आजपर्यंतची तिरसट वागणूक पाहून तिला धसका बसल्यासारखं झालं होतं.

"कुठं काय होतयं मला. न जेवल्यानं अंमळ ग्लानी आली असेल...जाऊं द्या मला ... ! रोजचंच आहे हें ... " ती म्हणाली

"काय तूं जेवली नाहीस ! का ? माझ्या रागावर ? अन् तुला रोज वांत्या होतात ! मला सांगितलं का नाहीस आजपर्यंत ! औषध— "

"औषधानी काय व्हायचंय... होईल आपोआप बरं ... "

सुहासला एक शंका आली होती. खरंच ! गेल्या तीन महिन्यांत खाणा-वळीचा बवा आणावा लागला नाही. कसं लक्षांत आलं नाही आपल्या !! त्यानं कमलला उचलली.

'कमा ! खरं का ! सांग नं कमा !! मग माझ्यापासून लपवून का ठेवलंस अं ! ......

" तुम्ही रागावता म्हणून...... "

" यापुढे मी रागावणार नाही. लागेल तर.... ! कुणाची शपथ घेऊं मी... !

तो कुणाची शपथ घालणार आहे हें लक्षांत येऊन तिनं त्याच्या तोंडावर हात ठेवला.

"कांही नको शपथ घ्यायला— "

आणि दुसऱ्या दिवसापासून आनंदानं जणु सूर्यकिरणांच्या रथावर बसूनच त्या घरांत प्रवेश केला. अगदी बारिक सारिक गोष्टींतहि लक्ष घालून, तिला त्रास होणार नाही याची तो काळजी घेऊं लागला. दुपारीं ऑफिसांत जाऊन त्यानं डॉ. मिस फ्लॉरेन्सला ही बातमी सांगितली. दुसऱ्या दिवशी कमलला तपासायला आणायचं आणि यापुढं प्रत्येक महिन्याला तिला तपासायला आणायच्या तिच्या योजनेला त्यानं संमति दिली.

" आपल्याला आतापासूनच काय धाड झालीय " असं कमलनं म्हणतांच 'बायकांचं चुकतं कुठं ' या विषयावर डॉ. मिस फ्लॉरेन्सनं त्याला सुनावलेलं लेक्चर अगदि इत्थंभूत तिखटमिठासुद्धा त्यानं तिला ऐकवलं होतं. " बर्थ ऑफ ए बेबी " हा अमेरिकन चित्रपटहि तिच्या इच्छेविरुद्ध त्यानं तिला दाखविला.

डॉक्टरवाक्य प्रमाण अशी जी सुहासची मनोवृत्ती झाली होती त्याला त्याच्या एकेकाळी सफल न झालेल्या आकांक्षा कारणीभूत होत्या. आपण डॉक्टर व्हावं अन् गरीब समाजाची निरलस सेवा करावी ही त्याची महत्वाकांक्षा कौटुंबिक अडचणीमुळे अतृप्त राहली होती. ती इच्छा तो आता निराळ्या मार्गानं तृप्त करून घेत होता. डॉ. मिस फ्लॉरेन्सच्या हॉस्पिटलमध्ये जरी तो हेडक्लॉर्क म्हणून काम करीत होता तरी त्यानं आपली चिकित्सक बुद्धि सोडली नव्हती. त्याच्या शंकाकुशंका देखील तो सोडवीत असे. त्याचं ज्ञान तपासून पाहला ती कधी कधी त्याची यट्टाहि करी.

आपल्या बोलण्यावर सुहासचा पूर्ण विश्वास असतो हें पाहून तिनं त्याची गंमत करण्यासाठी, एकदा एका लठ्ठ बाईला तपासून झाल्यावर म्हटलं होतं—

" ऐकलं का ! मि. पटवर्धन !! आता ही बाई गेली नं तपासून ? तिला काय झालं असेल असं वाटतं तुम्हाला ?-- "

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" मेदोवृद्धि झालीय बहुतेक—" सुहास म्हणाला.

" अगदी सपशेल चूक! तिच्या शरीराकडे पाहून कुणीहि सांगेल क्षय झालाय तिला—"

" काय! क्षय! अन् या बाईला!— "

" कां खोटं वाटतं माझं म्हणणं तुम्हाला! "

" असेल बुवा! नाही कुणी म्हणावं—" या त्याच्या उत्तरावर एका ' सिस्टर ' कडे पाहून तिनं डावा डोळा मिचकावला होता ही गोष्ट त्याला कळली नाही. ' सिस्टर ' नं त्याला संध्याकाळी सांगितलं तेव्हा त्याला डॉ. मिस् फ्लॉरेन्सचा थट्टेखोरपणाबद्दल असा राग आला की—

पण करता काय! तो राग फार वेळ टिकूं नये अशीच मोहिनी डॉ. मिस फ्लॉरेन्सनं त्याच्यावर घातली होती. तिचा आपल्यावर फार जीव आहे जाणून कित्येकदा आजारी असतांना देखील तिच्या कामाची खोटी होऊं नये म्हणून तो ऑफिसांत आला होता.

आणि तिच्या तें लक्षांत येतांच आपल्या ' ऑस्टिन ' मध्ये घालून त्याला तिनं घरीं पोचवलं होतं. नवऱ्याची नीट काळजी घेत नाही म्हणून कमलची गोड शब्दांत तिनं कानउघाडणी केली होती.

—" मला नवरा असता तर त्याला असं वागवलं असतं की—"

" जणु एखादा दुखणेकरीच होता! पण डॉक्टर तुम्ही लग्न कराच मग आम्हीहि बघूं कोण कुणाची काळजी घेतंय तें—कमलनं बोलतां बोलतां टोमणा मारला होता. का कुणास ठाऊक पण डॉ. मिस फ्लॉरेन्सनं आपल्या लग्नाचा विषय पाघळूं दिला नाही.

या असल्या गोड नि लाघवी वागणुकीमुळे सुहासचा तिच्यावर पूर्ण विश्वास बसला होता. तिनं आपलं मत सांगावं नि यानं ते ग्राह्य मानावं असा प्रकार होता. त्यामुळे तिची थट्टा देखील त्याच्या लवकर लक्षांत येत नसे.

परवा कमलच्या पोटांत कळा यायला सुरवात होताच त्यानं तिला टांग्यांत घातलं. निरनिराळ्या गमती सांगून तिचं दुःख तो हलकं करूं पाहात होता. ईश्वरानं स्त्रीजातीवर निव्वळ जुलूम केला आहे. असं म्हणतांच तिनं म्हटलं—

" त्याला का बिचाऱ्याला उगाच दोष— "

ती हसलेली पाहून तोहि हसला. चाफेकरांकडे जाऊन डिंकाच्या नि मेथीच्या लाडवांची ऑर्डर देतों म्हणून सांगितलें. रामटेकची विड्याच्या पानांची बाग घेतली आहे अशीहि गप्प त्यानं ठोकून दिली.

दवाखान्यांत येताच डॉ. मिस् फ्लॉरेन्सच्या स्वाधीन तिला करून तो बाहेर बसला. आंतून बुटांचा टप्टप् आवाज करीत धवलवसनधारिणी परिचारिका येई नि स्प्रिंगचें अर्धदार हलत ठेवत निघून जाई. एखाद्या परिचारिकेनं ' ट्रे 'मध्ये शस्त्रं झांकून नेलीं म्हणजे त्याचा जीव खालीवर होई. " हीं सारीं माझ्या कमलिनीसाठीच असतील! " त्याला वाटे. गंभीर रसाच्या अभिनयाचें अविष्करण करण्यांत असीम परिसीमा गाठणाऱ्या नटीप्रमाणे त्या परिचारिकांच्या चेहऱ्यावरचे भाव पाहून त्याच्या मनांत निरनिराळ्या कल्पना येत.

त्याच्या नकळत डॉ. मिस् फ्लॉरेन्स दारांत येऊन उभी होती. रबरी मोजे घातलेले हात ' एप्रन ' च्या खिशांत होते. शंकराच्या गळ्याभोंवती सापाचें वेटोळें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वळवळत असावे त्याप्रमाणे स्टेथास्कोप तिच्या गौर आणि डौलदार गळ्याभोवति रुळत होता. चेहऱ्यावर मात्र नेहमीचाच मिष्किलपणा— !!

तो उठून उभा राहिला. एकदम आश्चर्य वाटल्याचा अभिनय करून ती म्हणाली,

“ पटवर्धन तुम्ही ! अन् इथं ! इथं बसलेली ती बाई कुठं गेली ? ”

त्याला मोठं आश्चर्य वाटलं. कमलला तिच्या स्वाधीन करतांच आपल्याला बाहेर थांबायला तिनंच सांगितलं नं ! मग ही काय काम आहे असं विचारते याचा काय अर्थ ! अन् बाई कुठली ! मघापासून तर कुणीहि बाई आली नाही ! मग......

पण ती हंसली अन् त्याबरोबर या विचित्र पेचप्रसंगांतून सुटल्याबद्दल त्याला हायसं वाटलं. तिला काय वाटलं कुणास ठाऊक. ती म्हणाली,

“ वरीच सिरीयस तब्यत आहे ...... ”

“ अं ! पण तिनं सांगतांक्षणींच तर आणलं मी तिला. नीट होईल नं सारं ! की सिव्हिल सर्जनला ... ”

“ सिव्हिल सर्जन काय करूं शकणार ... ”

त्याचं काळीज अगदी तोंडांत आलं, घशाला कोरड पडली. ती म्हणाली,

“ मी सांगतें तें औषध घेऊन ये चटकन ...... ”

“ सांगा...लवकर...... ”

“ दोन शेर केशरी पेढे तयार ठेव दोन वाजेपावेतों ” आणि ती आंत गेली. त्याच्या काळजीची ताणलेली तार सैल सुटतांच त्याला हायसं झालं. एकदम दोनदोन तीनतीन पायऱ्या एकदम उतरून तो रस्त्यावर आला. “ बालबच्च्यां ” न आशीर्वाद देणाऱ्या एका भिकारिणीला हाताला येईल तें नाणें दिलें. खोलींत पोंचला तेव्हा आपण वाऱ्यावर तरंगत आलों की काय असं त्याला वाटलं.

दुपारी दोन वाजेपर्यंतचा वेळ त्यानं मोठ्या अधीरपणानं काढला. पावणे दोनावर काटा येतांच भरभर कपडे करून तो बाहेर पडला. कित्येक दिवसांत न भेटलेले लोक आजच आपल्याला भेटत आहेत याचं त्याला आश्चर्य वाटत होतं. नागपूरच्या रघुजी भोसल्याप्रमाणे सगळ्यांचे नमस्कार घेतांघेतां त्याचे हात दुखायला आले होते. आपण इतके लोकप्रिय असूं ही गोष्ट आजवर त्याला ठाऊक नव्हती. तो बाहेर जातो आहे असं दिसतांच स्वत:साठी थोडीतरी भाजी आणायला सांगणारी शेजारची मथुकाकी समोरून पिशवी घेऊन येतांना दिसतांच तो घाबरला. आपला रोख धरून वेगानं धावत येणाऱ्या म्हशीला टाळावं इतक्या तडफेनं तो रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला गेला. प्रत्येक चौरस्त्यावर रहदारीनं त्याचा खोळंबा होई म्हणून त्याला वाटे ‘ पेट्रोल पुरवठ्या ’वर सरकारनं एवढं नियंत्रण घातलं तरी अजून इतक्या मोटारी रस्त्यानं जातांना दिसतात तरी कशा ?

तो हॉस्पिटलमध्ये येऊन बसला तेव्हा मात्र त्याला आपण फार लवकर येऊन पोंचलों असं वाटायला लागलं होतं. परंतु अर्ध्या तासानंतर तिथून बाहेर पडतांना पायांत मणमण लोखंडाच्या बेड्या घातल्या असाव्यात इतकीं हळुहळु त्याचीं पावलं पडत होतीं.

खोलींत शिरतांना त्यानं दाराच्या फळ्या इतक्या जोरानं उघडल्या की भिंतीवर अडकवलेली फोटोफ्रेम धाडदिशी खाली पडली. फळ्या हलत होत्या, कडी देखील हलत होती. त्याच्या रागाची झळ त्या अचेतन वस्तूंना पोंचून जणु त्या भीतीनं थरथरत होत्या.

त्यानं तो फोटो उचलला. आणि दुसऱ्याच क्षणी शक्य तितक्या आवेशानं जमीनीवर आपटला. खळखळ करीत कांचा सगळीकडे पसरल्या. फोटोंतला कमलचा चेहरा फाटून गेला होता. समोरच्या भिंतीवरच्या कमलच्या आवडीच्या 'ग्लॅक्सो' बेबीचे तुकडे करून वाऱ्यावर उधळून दिले. तिच्या सहवासानं पुनीत झालेली प्रत्येक वस्तू त्यानं अस्ताव्यस्त करून टाकली. त्याच्या मस्तकाच्या शिरा थाड् थाड् उडत होत्या. त्याला घेरी आल्यासारखं झालं. बाजूची खुर्ची धरून तो खाली बसला आणि जागच्या जागीच कलंडला.

तो भानावर आला तेव्हा संध्याकाळ झाली होती. रस्त्यावरच्या दिव्याचे किरण चोरून आंत शिरले होते.

त्याचं डोकं बधीर झालं होतं. आपण या परिस्थितींत आलों कसें हें त्याला आठवेना. त्यानं डावा हात कपाळाला लावला. दारांतून थंड वाऱ्याची झुळुक येत असूनहि आपल्याला इतका घाम यावा याचं त्याला आश्चर्य वाटत होतं.

...आपण खोलींत आलों केव्हा ! ...स्मरणशक्तीला ताण देत, भिंत चांचपडत तो उभा राहिला. बटन् दाबतांच प्रकाश पडला. जवळच्या आरशांत त्यानं आपला चेहरा पाहिला. तो चमकला. हातांत कांचा रुतून निघालेलं रक्त वहात जाऊन मनगटावर थिजलं होतं आणि तेंच त्याच्या कपाळाला लागलं होतं. साऱ्या अस्ताव्यस्त वस्तु पाहून हळूहळू त्याच्या मनांत प्रकाश पडत होता. हॉस्पिटल मधला प्रसंग त्याला आठवला—

डॉ. मिस फ्लॉरेन्सनं सांगितल्याप्रमाणे तो सव्वादोनच्या सुमारास हॉस्पिटलमध्ये येऊन बसला होता. बऱ्याच वेळानं तें अर्धफळ्याचं दार उघडलं होतं. भुरभुरणाऱ्या सोनेरी केसाची, सडपातळ अंगाची आणि टपोऱ्या नीलवर्ण डोळ्याची डॉ. मिस फ्लॉरेन्स दाराशीं येऊन उभी राहिली. एक हात दारावर ठेवून ती म्हणाली,

" Yes, come in "

हॉलमध्ये जातांच तिनं विचारलं,

—" पटवर्धन काय हवं तुम्हा—? मुलगा की मुलगी—? "

तो नुसताच हंसला होता. त्याला वाटलं आपण म्हणावं मुलगा अन् झाली असावी मुलगी. तेवढंच तिला थट्टेला एक निमित्त !!

ती आपण होऊनच म्हणाली,

" Its a boy ! congrats "

(मुलगा झालाय तुला! अभिनंदन करतें तुझं मी—")

Thanks Docor 'एवढंच तो उद्गारला.'

" पण— "

येवढंच बोलून ती क्षणभरच थांबली. बोलावं की बोलूं नये असं तिला वाटत होतं की काय कुणास ठाऊक. तिच्या थट्टेखोर स्वभावानं उचल खाल्ली. तिच्या त्या निळसर डोळ्याकडे सुरसनं पाहिलं असतं तरी ती आता आपली कांहीतरी थट्टा करणार हें त्याला कळलं असतं. पण तो आनंदांत मग्न झाला होता. त्याच्या डोळ्यापुढे निराळींच चित्रं तरळत होतीं.

हॉलचं आंतलं दार उघडून एक नर्स आली. दारांतूनच ती म्हणाली,

" रूम नं. २१ डॉक्टर ! सगळी तयारी आहे.— " [अपूर्ण]

संघवार्ता

प्रा. ना. कृ. दिवाणजी
सरचिटणीस
वि. सा. संघ यांजकडून

कार्यकारी मंडळाच्या सभा

फेब्रुवारी १९४९ च्या अंकांत प्रसिद्ध झालेल्या संघवार्तेनंतर विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाच्या एकूण चार सभा झाल्या. त्याच अंकांत संघवार्तेच्या सदराखाली जाहीर केल्याप्रमाणे १९४९ करिता निवडून आलेल्या कार्यकारी मंडळाची माहिती खाली देण्यांत येत आहे. ता. ६-३-४९ च्या का. मं. च्या सभेने घटनेप्रमाणे केलेल्या अध्यक्षाखेरीज इतर पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकींचाहि खालील माहितीत समावेश केला आहे. १९४९ करिता खालीलप्रमाणे कार्यकारी मंडळ तयार झालें आहे.

१. डॉ. माधव गोपाळ देशमुख, अमरावती—अध्यक्ष
२. प्रा. वामन कृष्ण चोरघडे, वर्धा—उपाध्यक्ष
३. प्रा. नारायण कृष्ण दिवाणजी, अमरावती—सरचिटणीस
४. प्रा. मा. ल. व्यवहारे, अमरावती—खजीनदार
५. रा. प्र. ना. खोडे, अकोला }
६. रा. रा. पु. सगदेव, नागपूर } — चिटणीस
७. रा. के. व. कदम, आर्वी }
८. रा. वामन नारायण देशपांडे, यवतमाळ —संपादक 'युगवाणी'
९. डॉ. वि. भि. कोलते, नागपूर — सभासद
१०. रा. पु. य. देशपांडे, ,,
११. प्रा. श्री. ना. बनहट्टी, ,, ,,
१२. रा. द. रा. गोमकाळे, मलकापूर — ,,
१३. रा. शं. ना. सहस्रबुद्धे, अमरावती — ,,
१४. प्रा. ग. त्र्यं. देशपांडे, ,,
१५. रा. धैर्यशील वाघ, ,, ,,
१६. प्राचार्य ह. ना. नेने, ,, } स्वीकृत
१७. प्रा. भ. श्री. पंडित, नागपूर } सभासद.

अधिकारप्रदान

ता. ६-३-४९ रोजीं अमरावतीला न्यू हायस्कूलमध्ये अधिकारप्रदानाचा कार्यक्रम झाला. डॉ. वि. भि. कोलते (१९४८ सालाकरिता अध्यक्ष) यांनी वि. सा. संघाने वर्षभर केलेल्या कार्याचा आढावा आपल्या भाषणांत घेतला आणि औपचारिक रीत्या वि. सा. संघाचीं सूत्रें नवीन संघाध्यक्ष डॉ. मा. गो. देशमुख यांच्या स्वाधीन केलीं. डॉ. मा. गो. देशमुख यांनीहि प्रसंगोचित भाषण करून त्यांचा स्वीकार केला आणि नवीन वर्षाच्या कार्याची रूपरेषा साधारण सभेपुढे मांडली.

घटनेंत महत्त्वाचा बदल

याच प्रसंगानिमित्त भरलेल्या साधारण-सभेने घटनेंत सभासदांच्या वर्गणीबाबत एक महत्त्वाचा बदल केला. त्यासंबंधांत मध्यवर्ती कार्यालयांतून सरचिटणिसाच्या सहीने निघालेलें पत्रक खाली संपूर्ण देण्यांत येत आहे. त्यांत सर्व खुलासा होईलच.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

“ विदर्भ साहित्य संघाच्या सर्व सभासदांच्या माहितीकरिता हें पत्रक सर्व सभासदांकडे पाठविण्यांत येत आहे.

ता. ६-३-४९ रोजीं अमरावती येथे भरलेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेने व सर्वसाधारण सभेने घटनेच्या ३ ऱ्या नियमांत बदल करून वा. व. रु. ५ व रु. २ देणाऱ्या साधारण सभासदांच्या दोन वर्गांच्या ऐवजी, वा. वर्गणी रु. ३ देणारा असा एकच वर्ग केला आहे आणि या तीन रुपयांतच विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र ‘ युगवाणी ’ प्रत्येक सभासदाकडे पाठविण्यांत येईल अशीहि योजना आखली आहे. या योजनेमुळे पहिल्या वर्गाच्या सभासदांचा, ‘ युगवाणी ’ मिळूनहि रु. २ चा फायदा होईल आणि दुसऱ्या वर्गाच्या सभासदांना एका रुपयांत ‘ युगवाणी ’ मासिक वर्षभर मिळेल. या योजनेचा फायदा सर्व सभासदांनी घ्यावा अशी विनंती आहे. या योजनेसंबंधांत खालील सूचना सर्व सभासदांना देणें आवश्यक वाटतें.

१. १९४९ करिता प्रत्येक सभासदाला रु. ३ वार्षिक वर्गणी द्यावी लागेल. याच वर्गणींत ‘ युगवाणी ’ मासिक मिळेल.

२. घटनेच्या दुसऱ्या नियमाप्रमाणे सभासदत्वाबरोबर ‘ युगवाणी ’ची वर्षगणनाहि जानेवारी ते डिसेंबर अशीच राहील. त्यामुळे ज्या महिन्यांत वर्गणी जमा होईल त्या महिन्यापासून डिसेंबरपर्यंतचे अंक सभासदाकडे रवाना होतील. मागील अंक पाठविणें नेहमी सोयीचें पडणार नाही. तेव्हा प्रत्येक सभासदाकडून दरवर्षी जानेवारींतच नवीन वर्षाची वर्गणी जमा होणें इष्ट आहे.

३. पहिल्या वर्गाच्या ज्या सभासदांची १९४९ ची वर्गणी आतापर्यंत जमा झाली आहे, त्यांच्या रु. ५ पैकी, चालू सालची वर्गणी वजा जातां, राहिलेले रु २, १९५० ची वर्गणी म्हणून वि. सा. संघाजवळ जमा राहतील. पुढील वर्षी त्यांच्याकडून एकच रुपया वर्गणी जमा करून घेण्यात येईल.

४. दुसऱ्या वर्गाच्या ज्या सभासदांची १९४९ ची वर्गणी जमा झाली आहे, त्यांनी हें पत्रक पावतांच एक रुपया पाठवावा; म्हणजे ‘ युगवाणी ’ त्यांच्याकडे रवाना होईल.

५. तहाहयात सभासदांचा ‘ रु. ५० व अधिक देणारे ’ असा एकच वर्ग आता यापुढे राहील. त्यामुळे रु. २५ देऊन दुसऱ्या वर्गाचे जे तहाहयात सभासद झाले आहेत, त्यांनी रु. २५ अधिक पाठविण्याची कृपा करावी. म्हणजे त्यांच्याकडे ‘युगवाणी’ मासिकाचे, पूर्वीच्या नियमाप्रमाणे मिळत नसलेले, अंक पाठविण्यांत येतील.

वरील योजना यशस्वी व्हावयास सर्व वर्गांच्या सभासदांचें हार्दिक सहकार्य मिळेल अशी आहे. ”

‘ युगवाणी ’ संबंधीं नवा करार

याच सभेंत ‘ युगवाणी ’ संबंधांत रा. द. ना. ठाकूर यांच्याशीं नवा करार करण्यांत आला. पुसद येथे झालेला करार या नव्या करारान्वयें रद्द झाला आहे. हा नवा करार नवीन वार्षिक अहवालांत सविस्तर समाविष्ट करण्यांत येईल.

‘ युगवाणी ’चे नवीन संपादक

ता. ६-३-४९ नंतर झालेल्या का. मं च्या सभांत ‘ युगवाणी ’च्या संपादकीय व्यवस्थेंत उल्लेखनीय बदल करण्यांत आला. ‘ युगवाणी ’चे आद्य संपादक रा. वा. ना. देशपांडे यांनी संपादकत्वाचा राजीनामा दिल्यामुळे, प्रथम प्रा. भ. श्री. पंडित यांची त्या जागीं निवड करण्यांत आली. परंतु त्यांना सरकारी परवानगी न मिळूं शकल्यामुळे, प्रा. वा. कृ. चोरघडे यांना ‘ युगवाणी ’चे संपादक म्हणून नियुक्त करण्यांत आलें. त्यांनीहि मोठ्या आनंदाने ही जबाबदारी स्वीकारली. आजचा अंक त्यांच्याच संपादकीय-व्यवस्थेखाली निघत आहे. ‘ युगवाणी ’चे अंक लांबणीवर पडण्याचें हेंच कारण आहे. यापुढे ‘ युगवाणी ’चे अंक नियमित-

[मुखपृष्ठ नं. २ वर चालू]

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"युगवाणी" (Yugawani) Regd. No. N.945
मध्यप्रांत वऱ्हाड शाळाखात्याने आपल्या ता. ...४७ च्या ऑर्डर नं. 104 Genl I A
अन्वये 'युगवाणी' मासिकास लायब्ररीसाठी मंजुरी दिली आहे.

एकमेव विक्रेते

ठाकूर आणि कंपनी लिमिटेड,

अमरावती–अकोला–नागपूर

द. ना. ठाकूर यांनी ठाकूर आणि कंपनी लि. च्या महेश्वर मुद्रणालयांत छापून 'युगवाणी' कार्यालय १९ | ४२५ मुरेळकर पेठ, अमरावती– येथे प्रकाशित केलें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ